दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

वैभव विवेक स्वामी
सपादक

SAMARTH RAJYOG

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -३४४ रविवार,दि.१७ ऑगस्ट २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-344 Sunday, Dt.17 August 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# सावधान ! मांजरा धरणाचे ४ दरवाजे उघडले, बीड लातूरसह नदीकाठच्या गावांना सतर्कतेचे इशारे



## १८ तासातच मांजरा धरणाच्या पाणीसाठ्यात २२ टक्के वाढ

मांजरा धरण क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे गेल्या १८ तासातच या प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात २२ टक्के इतकी मोठी वाढ झालीय. १५ ऑगस्ट रोजी दुपारी या धरणात ५७ टक्के असलेला पाणीसाठा १६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता थेट ८० टक्क्यावर पोहोचला आहे. यामुळे आता पुढील दोन वर्षापर्यंत परिसरातील पाणी प्रश्न मिटला आहे. बीड जिल्ह्यात असलेल्या मोठ्या प्रकल्पापैकी मांजरा एक असून याच मांजरा धरणातून बीड, लातूर,धाराशिव जिल्ह्यातील २२ गावांना पाणीपुरवठा केला जातो. तसेच या धरणाचे पाणी शेतीच्या सिंचनासाठी देखील वापरण्यात येते.

बीड - मराठवाड्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असणाऱ्या मुसळधार पावसाने बीड, धाराशिव लातूर जिल्ह्यात बऱ्याच भागांना तडाखा बसलाय . लातूर-धाराशिव आणि बीड जिल्ह्यांच्या सीमारेषेवर असलेल्या मांजरा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. लातूर शहराला पाणीपुरवठा करणारे हे मुख्य धरण ९०% पेक्षा अधिक भरल्यामुळे प्रशासनाने दरवाजे उघडण्याचा निर्णय घेण्यात आलाय ..

मांजरा धरणाचे ४ दरवाजे उघडले

मांजरा धरणातील ४ वक्रद्वारे प्रत्येकी ०.२५ मीटर उंचीने उघडून ३४९४.२८ क्यूसेक्स (९८.९६ क्यूमेक्स) इतका विसर्ग मांजरा नदीपात्रात सोडण्यात आला आहे. पुढील पावसाच्या स्थितीनुसार विसर्गात बदल करण्यात येईल, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

नागरिकांना इशारा

नदीकाठावरील तसेच पुरामुळे बाधित होऊ शकणाऱ्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

कोणीही नदीपात्रात उतरणार नाही.जीवित अथवा वित्तहानी होणार नाही याची खबरदारी घ्यावी. अशा सूचना करण्यात आल्या आहेत . बीड, लातूर, धाराशिव आणि कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाटबंधारे विभागाने याबाबतचे पत्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले होते . आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज राहण्याचे आदेश यात दिले होते. नदीकाठच्या गावकऱ्यांनी अनावश्यक धोका न पत्करता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, अशी विनंती करण्यात येत आहे. विशेषतः पूरकाठावरील शेती, जनावरांचे चारण तसेच घरांची सुरक्षितता याकडे ग्रामस्थांनी लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

मांजरा नदीची वैशिष्ट्ये

लातूर जिल्ह्यातून १४५ किमी अंतर पार करत वाहणारी ही नदी. याच नदीवर मांजरा धरण बांधले असून ते लातूरकरांच्या पाण्याचा प्रमुख स्रोत आहे. नदीपात्रात सध्या पाण्याची मुबलकता असून तिच्यावर ११ बॅरेजेस बांधण्यात आले आहेत. रेना, तावरजा, तेरणा या नद्या तसेच अनेक ओढे मांजरा नदीत मिळत असल्याने प्रवाह अधिक वाढला आहे.

# दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने ५ सप्टेंबर शिक्षक दिनी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

## पुरस्कारासाठी पात्र शिक्षकांनी ऑन लाईन अर्ज सादर करावा - वैभव स्वामी

बीड प्रतिनिधी

येत्या ५ सप्टेंबर २०२५ शुक्रवार रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून बीड जिल्ह्यातील गुणवंत शिक्षकांना मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी पात्र गुणवंत शिक्षकानी ७० ३० १४ ९३ २२ या व्हाट्सअप नंबर वर ऑन लाईन नोंद करावी, असे आवाहन दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे.

दि. ५ सप्टेंबर हा दिवस आदर्श शिक्षक दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. प्रतिवर्षाप्रमाणे दैनिक समर्थ राजयोगच्या ६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून यावर्षी देखील गुणवंत असलेल्या शिक्षकांना राज्यस्तरीय पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार राज्यशासनकर्ते मंत्री महोदय, प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार संघाचे प्रमुख पदाधिकारी आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सन्मानपूर्वक वितरित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी ज्ञानदानाचे समर्पित कार्यासोबतच सामाजिक जाणीव ठेवून जनहितार्थ कार्य करणाऱ्याच गुणवंत शिक्षकांनी तात्काळ ७० ३० १४ ९३ २२ या व्हाट्सअप नंबर वर ऑन लाईन छायांकित कार्यासह बायोडाटा पाठवून नोंद करावी असे आवाहन दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे.

राज्यात पहिल्यांदाच आश्रम शाळेतील शिक्षकांचा होणार गुणगौरव...

५ सप्टेंबर रोजी सर्वत्र आदर्श शिक्षक दिन साजरा होतो. दैनिक समर्थ राजयोग हे वृत्तपत्र शिक्षण क्षेत्रासाठी समर्पित आहे. वृत्तपत्राच्या प्रथम वर्धापन दिनापासून दरवर्षी आदर्श शिक्षकांना सन्मानित करून वर्धापन दिन साजरा केला जातो. गतवर्षी फक्त अल्पसंख्यांक समाजातील गुणवंत शिक्षकांना सन्मानित करण्यात आले होते.यावर्षी आश्रम शाळेतील शिक्षकांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यातील आश्रम शाळेतील प्राथमिक आणि माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षकांनी पुरस्कारासाठी आपली नोंद करावी असे आवाहन करण्यात आले आहे.



पुरस्कारासाठी पात्रता..!

सदरील शिक्षक बीड जिल्ह्यातील असावा.त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्याने विद्यार्थ्यांची सुसंकृत पिढी घडत असावी,त्यांचे शैक्षणिक कार्यासह सामाजिक योगदान ही असल्यास प्राधान्य,एका तालुक्यातून दोन पुरस्कारार्थी निवडण्यात येणार आहेत. यामध्ये प्राथमिक शिक्षण विभागातून एक आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातून एक

(उर्वरीत पान २ वर)


# संकटात संघर्षासाठी आम्ही सदैव भगवानबाबांचे स्मरण करतो माजी खा.डॉ.प्रीतमताई मुंडे

### संत भगवानबाबांच्या जन्म गावी जोरदार स्वागत

आष्टी । प्रतिनिधी

तुमच्याकडे येण्यासाठी मला कोणत्याही निमित्ताची किंवा निमंत्रणाची ही गरज नाही. आपण माझी माणस आहात अशा भावनिक शब्दात सुरुवात करत जेव्हा जेव्हा आमच्यावर संकटे येतात तेव्हा आम्ही संघर्षामध्ये भगवानबाबांचे स्मरण करतो आणि संकटे हलके होतात असे भावोद्गार बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी काढले.

बुधवारी संत भगवानबाबांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र भगवानभक्तीगड



येथे उपस्थित राहून भगवानबाबांच्या मूर्तीची मनोभावे नतमस्तक होत आशीर्वाद घेऊन अभिवादन केले. तेव्हा आयोजित कार्यक्रमाच्या मंचावरून खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे संवाद साधत होत्या. यावेळी काल्याचे कीर्तन विदर्भ रत्न रामायणाचार्य ह. भ. प.

(उर्वरीत पान २ वर)

# बीड शहरातील १५ प्रमुख रस्त्यांसाठी मिळणार १०० कोटींहून अधिक निधी

बीड - येथील नगरपरिषद हद्दीतील प्रमुख डी.पी. रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीट बांधकाम व नाली सुधारणा करण्यासाठी लवकरच १०० कोटींहून अधिक निधी मिळणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सन २०२३ मध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) २०२३-२४ अंतर्गत एकूण १७ रस्ते व नाली बांधकाम

(उर्वरीत पान २ वर)



# बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध - उपमुख्यमंत्री अजित पवार

## सर्वांच्या सहकार्याने बीड जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करुन चेहरा-मोहरा बदलणार

बीड : बीड जिल्ह्याचा कृषी, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आर्थिक, सांस्कृतिक, उद्योग व क्रीडा आदी क्षेत्रातील सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटिबध्द असून, जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणुन याकरीता सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार



यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यातील नागरिकांना शुभेच्छा देत म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांना, क्रांतीकारकांना, हौतात्म्य पत्करलेल्या शहिद वीरांना, अभिवादन केले आहे. असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य, देशाची एकता, अखंडता, सार्वभौमता अबाधित ठेवण्यासाठी

(उर्वरीत पान २ वर)

# ना.अजितदादांकडून बीड शहरातील रस्ते, नाल्यांसाठी तब्बल १०० कोटींचा निधी

बीड (प्रतिनिधी): बीड शहरातील रस्ते आणि नाल्यांची सुधारणा करण्यासाठी ना.अजितदादा पवार यांनी शुक्रवारी (दि.१५) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत तब्बल १०० कोटी रूपयांचा निधी देणार असल्याचे सांगितले. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजित दादांचे आभार मानले आहेत.

बीड शहरातील रस्ते आणि नाल्यांचा प्रश्न हा नागरिकांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा झालेला आहे. शहरातील सर्व रस्त्यांची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. शहरातील रस्ते आणि नाल्यांच्या बाबतीत आ.संदीप

(उर्वरीत पान २ वर)

### आ.संदीप क्षीरसागरांनी मानले ना.अजितदादांचे आभार



# चोरीतील आरोपी व मुद्देमाल पोलीसांच्या ताब्यात

## संभाजीनगर परळी वै. पोलीसांची कौतुकास्पद कारवाई

बीड /प्रतिनिधी

दि. १४/०८/२०२५ रोजी फिर्यादी नामे नाथराव माणिकराव फड वय ६७ वर्षे व्यवसाय सेवानिवृत रा.शंकर पार्वती नगर परळी वै. ता. परळी वै, जि. बीड यांनी पोलीस स्टेशन संभाजीनगर परळी वै, येथे फिर्याद दिली की, दि. १३/०८/२०२५ रोजी १०.५५ वा. चे दरम्यान परळी बस स्थानक येथुन अंबाजोगाई येथे जाण्यासाठी बस मध्ये चढत असताना त्यांचे गळ्यातील सोन्याचा गोप वजन २५ ग्रॅम सध्या किं. अंदाजे २,५०,०००/ रुपयेची सोन्याचा गोप कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरले बाबत. पो.स्टे.

(उर्वरीत पान २ वर)



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

# १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन सोहळा :माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये अविस्मरणीय ठरला

परळी /प्रतिनिधी

येथील माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये भारत सरकार आयोजित हर घर तिरंगा या अभियानाद्वारे तीन दिवसीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम अगदी आनंद आणि हर्षोल्लसात साजरा केला गेला.

याप्रसंगी दि.१३/ ८/ २०२५ रोजी शाळेची प्राचार्य मंगेश काशीद सर तर दि. १४/ ८/ २०२५ रोजी शाळेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध डॉक्टर हरिश्चंद्र वंगे दादा यांच्या हस्ते तर दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी परळी शहरातील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्व प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. रामेश्वर बांगड यांच्या हस्ते ध्वजारोहणाचे कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या विविध कार्यक्रमाने संपूर्ण दिवस माऊंट लिटरा शाळेसाठी ऐतिहासिक क्षण ठरला. माऊंट लिटरा झी स्कूलचा पहिला स्वातंत्र्यदिनाचा सोहळा अतिशय उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी लवकरच शाळेच्या प्रांगणात विद्यार्थी, पालक व मान्यवरांच्या उपस्थितीत देशभक्ती गीतांच्या मधून संगीताने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्वातंत्र्याचा आनंद झळकत होता.

प्रमुख पाहुणे डॉ. रामेश्वर बांगड यांनी ध्वजवंदन करून विद्यार्थ्यांना देशसेवेचे व समाजासाठी काहीतरी करण्याचे प्रेरणादायी मार्गदर्शन दिले. दुसरे प्रमुख पाहुणे श्रीराम मुंडे यांनी ७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेला आवश्यकतेनुसार मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले उपस्थित व्यक्तिमत्व विलास मुंडे व सुरेश घुगे सर यांनी सुद्धा स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचा खरा अर्थ आणि स्वातंत्र्य म्हणजे काय याविषयी मार्गदर्शन केले

या विविध कार्यक्रममध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेली भाषणे, देशभक्तीपर गीते, कविता आणि नृत्याविष्कार पाहून उपस्थित पालक व मान्यवरांच्या डोळ्यांत



आनंदाश्रू दाटले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी केलेल्या वंदे मातरम च्या घोषणेमुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या उर्जेने भारावून गेला होता.

या वेळी माऊंट लिटरा झी स्कूलचे प्राचार्य मंगेश काशीद सर यांनी विद्यार्थ्यांना मेहनत, प्रामाणिकपणा आणि शिक्षणाच्या महत्त्वाबाबत मार्गदर्शन केले. शाळेचे अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा यांनी पालकांना उद्देशून लवकरच शाळेत गुरुकुल पद्धतीचे शिक्षण सुरू होईल अशी ग्वाही दिली. त्यांच्या या शब्दांनी पालकांच्या मनात नवा विश्वास व आशा निर्माण झाल्या आहेत.

आजचा हा पहिला स्वातंत्र्यदिन सोहळा विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वामुळे आणि मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे अविस्मरणीय ठरला. देशभक्तीचा उत्साह, एकतेचा संदेश आणि उज्ज्वल भविष्यासाठीची प्रेरणा प्रत्येकाच्या मनात घेऊन हा सोहळा दरवर्षी याच उत्साहाने साजरा करण्याची आश्वासन शाळेचे उपाध्यक्ष प्राध्यापक कैलास घुगे सर यांनी यावेळी दिले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यांनी खूप परिश्रम घेतले

## संपादकीय

# श्वानदंश

रात्री-अपरात्री घरी परतणे आता दिवसेंदिवस धोक्याचे बनत चालले आहे. ही भीती चोरट्यांची, लुटमार करणाऱ्यांची अथवा नशाबाज करणाऱ्यांची नसून भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाची आहे. भटक्या कुत्र्यांकडून एकवेळ भुंकणे समजू शकते; परंतु अलीकडे या कुत्र्यांच्या झुंडीमुळे अनेकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. ही समस्या कोणा भागापुरती मर्यादित राहिलेली नाही. यामुळे स्वत: सर्वोच्च न्यायालयाला भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर स्वत:हून याचिका दाखल करून घ्यावी लागली. समस्येचे गांभीर्य त्यातूनच दिसून येते. आपल्या देशात श्वानप्रेमींची संख्या लक्षणीय आहे. या श्वानप्रेमींना ही कुत्री स्वत:च्या घरात सांभाळायची नाहीत, तर रस्त्यावर, चौकाचौकांत असणाऱ्या भटक्या कुत्र्यांना खाद्य घालायचे आहे. एकीकडे श्वानांकडून होत असलेल्या उपद्रवाची जबाबदारी स्वीकारायची नाही आणि दुसरीकडे श्वानांविरोधात कारवाई केल्यास त्याविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलने करायची, न्यायालयाचे दरवाजे ठोठावयाचे अशा घटना श्वानप्रेमींकडून वाढू लागल्यात. रात्रीच्या वेळी उच्चभ्रू मंडळी आपल्या वाहनातून खाद्य घेऊन रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट कुत्र्यांचा शोध घेतात. राजधानी दिल्लीमध्ये सात महिन्यांच्या कालावधीत तब्बल २६ हजारांहून अधिक जणांना मोकाट कुत्र्यांनी चावे घेतल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला या समस्येची दखल घ्यावी लागली. दिल्लीमध्ये चावा घेण्याच्या संख्येत वाढ होत असली तरी यावर्षी जानेवारी ते जून दरम्यान ६५ हजारांपेक्षा अधिक कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण झाले आहे. महापालिका कार्यक्षेत्रामध्ये रात्रीच्या वेळी कचरा संकलन करणाऱ्या, कचरा वाहतूक कर्मचाऱ्यांना, धुरीकरण करणाऱ्यांना, मूषक नियंत्रण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व रात्रीच्या वेळी जे नागरी समस्या निवारणाचे व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम करतात, त्यांना महिन्यातून अनेकदा कुत्र्यांच्या हल्ल्यांना सामोरे जावे लागते. सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या आकडेवारीनुसार भारतात दरवर्षी कुत्रा चावण्याच्या ३७ लाखांहून अधिक घटना घडत; ३०५ लोक रेबीजमुळे मरण पावतात. केवळ निर्बीजीकरण पुरेसे नाही, मानवी जीवितांचे संरक्षण करणे आता आवश्यक झाले आहे. ३७ लाख हा आकडा कागदोपत्री असला, तरी प्रत्यक्षात हा आकडा अधिक असण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत असणाऱ्या कचराकुंड्या भटक्या कुत्र्यांचे माहेरघर बनले आहे. कचराकुंड्यांमध्ये सहजासहजी खाद्य उपलब्ध होत असल्याने भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी कचराकुंड्याभोवती दिसून येतात. घरात पाळल्या जाणाऱ्या कुत्र्यांची प्रशासन दरबारी नोंद करण्यास तसेच प्रशासनाकडे शुल्क भरणा करण्यास संबंधितांकडून टाळाटाळ केली जात असते. अनेकदा काही घटकांकडून लहानपणापासून घरामध्ये कुत्री पाळायची, पुढे तीच कुत्री रस्त्यावर सोडून दिली जातात.

दिल्लीतील भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानात ठेवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर मुंबईतील भटक्या श्वानांच्या बंदोबस्ताची मागणी आता मुंबईकर नागरिकांकडून सुरू झाली आहे. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पनवेल, उरण, नवी मुंबई, बदलापूर, अंबरनाथ, वसई-विरार भागातही मोकाट कुत्र्यांकडून चावे घेण्याचे, हल्ले करण्याची समस्या गंभीर झाली आहे. स्थानिक प्रशासनाकडून कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी श्वानाची धरपकड करण्याची मोहीम गल्लोगल्ली राबविली जात असते, त्यावेळी हे श्वानप्रेमी मोकाट कुत्र्यांना गच्चीवर तसेच सोसायटींच्या आवारात लपवून ठेवत असतात. गेल्या पंधरा वर्षांत १२ लाख ७३ हजार तर २०२४ मध्ये १ लाख ३५ हजार २५३ मुंबईकरांना भटक्या श्वानांनी चावा घेतला आहे. त्यामुळे, भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करून त्यांनाही आश्रयस्थानात हलवण्याची मागणी होत आहे. २०१४ च्या गणनेनुसार मुंबईत ९५ हजार १७४ भटके श्वान होते. गेल्या अकरा वर्षांत मुंबईतील भटक्या श्वानांची संख्या काही लाखांत गेली आहे. मुंबईत गेल्या २२ वर्षांत १६ लाख ६० हजार भटक्या श्वानांचा प्रश्न कायम आहे. दरवर्षी मुंबई महापालिका या भटक्या श्वानांची निर्बीजीकरण करत असते. मात्र, दर पावसाळ्यात हा प्रश्न ऐरणीवर येतो. भटक्या कुत्र्यांची समस्या नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वीच पालिकेने उपाय करण्याची मागणी होत आहे. मुंबईतील अनेक आमदारांनीही मतदारसंघातीलच नाही

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सत्कार

बीड : भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

सामाजिक न्याय भवन परिसरात आयोजित कार्यक्रमात यावेळी आमदार सर्वश्री संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी मध्ये पोलीस विभागातील पोलीस उपनिरिक्षक श्रीमती पल्लवी भाऊसाहेब जाधव, पोलीस हवालदार अशोक बापुराव शिंदे, पो.ह. प्रदिप निवृत्ती येवले, पोलीस उपनिरिक्षक श्रीराम रामदास खटावकर, पो.ह. शेख आसेफ शेख शमीम महसूल विभागातील निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, नायब तहसीलदार सचिन सुरेशराव देशपांडे, ग्राम महसूल अधिकारी सलीम शेख, संघर्षकुमार ओवे, सहायक महसुल अधिकारी जितेंद्र साहेबराव जाधव, राहुल रामनाथ बलाढ्ये, मंडळ अधिकारी श्रीमती शितल लक्ष्मणराव चाटे, परमेश्वर त्रिंबक काळे, सरपंच श्रीमती शेख मन्नाबी मुजफर पटेल क्रिडा विभागात क्रिकेटसाठी श्रावणी अजिनाथ तर दळवी, तायक्वांदोसाठी कु. नयन अविनाश बारगजे, व्हॉलीबॉलसाठी अफताब कुरेशी नौशाद, कबड्डीसाठी महारुद्र मधुकर गर्जे, खो-खोसाठी प्रताप शहादेव तुपे, योगा कु. सभाषिणी विनायकराव वझे, बेसबॉल/सॉफ्टबॉलसाठी आदित्य अरविंद विद्यागर

तसेच यावेळी अवयव दान करणाऱ्या नातेवाईकांचे देखील यावेळी सत्कार करण्यात आले. यामध्ये श्रीमती कोटुळे कोमल गोकुळदास (पत्नी) व बाबुराव



कोटुळे (वडील), अवयवदाता यांचे नातेवाईक प्रविण बालासाहेब निनाले (मुलगा), अवयवदाता यांचे नातेवाईक सुखदेव बाबुराव गायके (वडील), अधिसेविका श्रीमती गिरी रमा गोविंदराव, जिल्हा आरोग्य अधिकारी प्रातिनिधीक स्वरूपात डॉ. उल्हास गंडाळ, सुभेदार श्री. बलभिम किसन चिंचाणे, हवालदार श्री. अब्दुल वाजिद अब्दुल अजीज, कारागृह शिपाई श्री. रामआप्पा भागुजी परळकर, सहायक संशोधन अधिकारी महेश पुरूषोत्तम ठाकूर आदींचा यावेळी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. यावेळी भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सांस्कृतीक कार्यक्रम देखील पार पडला. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल शेळके, ज्ञानेश्वर कोटुळे, अथर्व शेळके यांनी केले. यावेळी लोकप्रतिनीधी, नागरिक, शालेय विद्यार्थी-विद्यार्थींनी,

# कु.धनश्री रविंद्र राऊत चे एमबीबीएस साठी अंबाजोगाई महाविद्यालयची निवड

माजलगाव(प्रतिनिधी) कु.धनश्री रविंद्र राऊत.रा कवडगाव बु.ता.वडवणी ह.मु. माजलगाव हि वैद्यकीय शिक्षणासाठी मेडिकल कॉलेज अंबाजोगाई येथे पात्र झाली आहे.कु.धनश्री राऊत MBBS शिक्षणक्रमांस अंबाजोगाई येथील महाविद्यालयात गुणवत्तेनुसार प्रवेशपात्र ठरली,ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

आतापर्यन्त कवडगाव ता.वडवणी येथील चार विद्यार्थी मेडिकलचे शिक्षण घेत आहेत.याच गावातील पोलीस खात्यात २०ते २२कॅन्डीडेट कार्यरत आहेत. आता ट्रॅक बदलून मुले वैद्यकीय शिक्षणकडे येत आहेत ही आनंदाची बाब आहे.

कु.धनश्री राऊत ने अतिशय मेहनत जिद्द चिकाटीने स्वयं अध्ययनातून



तिने हे यश मिळविले आहे. तिने दहावी पर्यंत मॉडेल इंग्लिश स्कुल,माजलगाव येथे शिक्षण पुर्ण केले तर बारावीचे शिक्षण लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय येथे पुर्ण केले.तसेच प्रा.प्रशांत तौर यांचे ज्ञानवर्धिनी कोचिंग क्लासेस, माजलगाव येथे नीटची तयारी पुर्ण केली.हे यश मिळाल्याने तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.तसेच पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.ती पत्रकार रविंद्र राऊत यांची मुलगी आहे.



# धर्माबाद शहरात हैदोस टाकणाऱ्या पिसाळलेल्या माकडाला आखेर पकडण्यात आले

धर्माबाद ( अशोक पडोळे )हुतात्मा पानसरे हायस्कूल, परिसरात धुमाकूळ घालून एक प्रकारची दहशत घालणाऱ्या माकडाला अखेर आज सकाळी हू.पानसरे हायस्कूलच्या समोर शाळेच्या आवरात सापडा रचून पकडून पिंजऱ्यात बंद केले, मागील काही दिवसापासून पिसाळलेल्या माकडाने हुतात्मा पानसरे हायस्कूल मधील प्रांगणात तसेच कॉलेज रोड,कोर्ट,शाळा,स्मारक,देवीगल्ली,अश्या अनेक ठिकाणी नागरिकांवर हल्ले करून गंभीर रित्या दुखापत करत होता,वारंवार वनविभाकडे सामाजिक कार्यकर्ते व स्थानीक् पिसाळलेल्या माकडाला पकडण्याची मागणी करत होते.

स्थानिक माजी नगर सेवक संजय पवार यांच्या धावपळी,व वरिष्ट अधिकाऱ्यांशी थेट बोलून हा प्रश्न मार्गी लागण्यास मदत मिळाली, तरी वन अधिकाऱ्यांनी सुद्धा माकडाला पडण्यासाठी अहोरात्र म्हेनत केली त्यात मा.वनपरिक्षेत्र अधिकारी श्री अंगद खटाने वनपरीमडळ आधिकारी बाबुराव पेरलेवाड वनरक्षक एम एफ शेख व वनसेवक विश्वाभर पुयड, शेषेराव कव्हळे, संदिप गौरकर यांच्या सोबत स्थानिक मुले त्यात चंदु मकलवाड, कृष्णा शेळके, पिराजी शेळके,बालाजी रॉपनवाड महेश,शंकर,नागेश यांनी काल रात्री पासून सापडा रचून माकडाला पकडण्यात् मोलाचे सहकार्य लाभले..

स्थानिक नागरिकांनी या कार्याचा कौतुक व कार्यात सहभागी झलेल्या सर्वांचा मनापासून धन्यवाद करत आहे,

पान १ वरून...

**बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण.....**

सर्वांनी वचनबद्ध होऊया, सामाजिक जाणीव, राष्ट्रीय कर्तव्य-जबाबदारीच्या भावनेतून राष्ट्रविकासात योगदान देऊया. स्वातंत्र्यदिन हा आपल्यासाठी सर्वात मोठा राष्ट्रीय उत्सव आहे. हा उत्सव तितक्याच उत्साहात, आनंदात, व्यापक स्वरुपात साजरा करायचा आहे. यंदाच्या स्वातंत्र्यदिनी आपण दृढसंकल्प करुया की, राष्ट्रविकासात सर्वांना सोबत घेऊन जाताना शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक यांना प्रगतीची योग्य संधी उपलब्ध करून द्यायची आहे. त्यांचे आर्थिक-सामाजिक सक्षमीकरण करायचे आहे. देशाचे स्वातंत्र्य, एकता, अखंडता, सार्वभौमता, लोकशाही मूल्ये अबाधित राखणे, भारतीय राज्यघटनेवरचा विश्वास अधिक दृढ करणे, ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. ती पार पाडण्यासाठी भारतमातेच्या अनेक सुपुत्रांनी आजवर सर्वोच्च त्याग केला, अमूल्य योगदान दिले. त्या सर्वांबद्दल आपण कायम कृतज्ञ असले पाहिजे. देशाचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी आपण सर्वांनी एकजूट होऊन देशाला समृद्ध, बलशाली देश बनवण्याचा निर्धार करुया.

मराठवाड्याची भूमी ही संतांची, शूर-वीरांची, बुद्धीवंत, कर्तृत्ववानाची भूमी आहे. मराठवाड्याला सहजासहजी काही मिळालं नाही, जे काही मिळालं ते संघर्ष करुनंच मिळाले आहे. देशाला १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले, परंतू मराठवाड्याला १७ सप्टेंबर, १९४८ रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्यासाठी सर्वसामान्य जनतेला, निजामाच्या सैन्याशी लढावे लागले. त्या त्यागाचं स्मरण करुन, त्यांना अभिवादन करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे स्वामी रामानंद तीर्थ यांनी नेतृत्वं केले होते. तसेच दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे यांच्यासारख्या नेत्यांनी त्यांना भक्कम साथ दिली होती. मराठवाडा मुक्तीसंग्रामात प्रत्येक गावातल्या लोकांनी सहभाग घेतला होता, हे या लढ्याचं वैशिष्ट्य होते. आपल्या बीडच्या विठ्ठलराव काटकरांनी निजामाच्या रोहिल्यांना जेरीस आणण्याचं काम केलं होतं.त्यांच्यासोबत काशिनाथ जाधव आणि हिरालाल कोटेचा हे भूमीपूत्र सुध्दा लढ्यात अग्रभागी होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, आजच्या या स्वातंत्र्य दिनी बीड जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून मी, आपणांस विश्वास देतो की, आपल्या सर्वांच्या सहकार्यानं बीड जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करुन चेहरा-मोहरा बदलायाचा आहे. बीड जिल्ह्यासाठी आपण अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर बीड विमानतळ विकास प्रकल्प हाती घेण्यात आला असून, त्यासाठी जागा निश्चिती आणि पूर्वव्यवहार्यता चाचणीसाठी लागणारा निधी जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच येणाऱ्या १७ सप्टेंबर म्हणजे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून आपल्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'बीड-अहिल्यानगर' रेल्वे सुरु करण्यात येणार असल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

जिल्ह्यातील युवकांना तंत्रज्ञानाधारित कौशल्य मिळण्यासाठी टाटा टेक्नॉलॉजी आणि एमआयडीसी यांच्या सहकार्याने सुमारे १९६.९८ कोटी रुपयांचा 'सीट्रीपलआयटी' हा प्रकल्प उभारण्यात येणार असून नुकतचे याचे भूमिपुजन झाले आहे. परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला सुधारित ३५१ कोटींची मान्यता देण्यात आली आहे. त्याच प्रमाणे बीडमधील श्री कंकालेश्वर मंदिर परिसराचा विकास करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यात महसूल भवनाच्या भूमिपूजनाचा शुभारंभ नुकताच पार पडला आहे. मागील आठवड्यात मी जिल्हा दौऱ्यावर असतांना प्रत्येक विभागातील विकासकामांचा आढावा घेतला आहे. त्यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयासह प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाची पाहणी करण्यात आली. लवकरच याठिकाणी अधिक कार्यक्षम आणि नागरिकाभिमुख प्रशासनासाठीच्या सुसज्ज इमारती तयार होणार आहेत. तसेच बीडमध्ये एक भव्य आणि अत्याधुनिक ग्रंथालय उभारण्यात येणार आहे. त्याचबरोबर सहकार भवनाची उभारणीही होणार असून, सहकार क्षेत्रातील सर्व कामकाज एका छताखाली सुलभपणे पार पडण्यास मदत होणार आहे. जिल्हा क्रीडा संकुलासाठी अतिरिक्त २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून संकुलातील विविध सुविधांचा विकास आणि विस्तारीकरण करण्यात येणार आहे. खेळाडूंना अत्याधुनिक

पान १ वरून...

सुविधा, प्रशिक्षणाची साधने आणि उत्कृष्ट पायाभूत व्यवस्था मिळणार आहे.

आपला महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य असून शेतीच्या बरोबरीनं पशुधनाचा विकासही महत्वाचा आहे. त्यामुळे परळी येथे होणाऱ्या नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांमुळे पशुपालकांना अत्याधुनिक, दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा मिळणार असून, राज्यात प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. राज्यातल्या पशुधनाच्या आरोग्याची काळजी आणि विकासासाठी हे पशुवैद्यकीय महाविद्यालयअत्यंत महत्वाची भूमिका बजावेल, असा त्यांनी यावेळी विश्वास व्यक्त केला. महसूल विभागाने 'जनता दरबार', 'सेवामित्र चॅटबोट', 'जिवंत ७/१२' मोहिम, 'महसूल सप्ताह', आणि विवादग्रस्त फेरफारांचे तात्काळ निवारण हे उपक्रम सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी राबवलेत. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांच्या आरोग्य तपासण्या, राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन प्रमाणपत्र, 'कायाकल्प' पुरस्कार, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणमधील ९४ टक्क्यांपेक्षा अधिक उद्दिष्टपूर्ती, 'लखपती दीदी' योजना, अंगणवाडी बांधकाम या उपक्रमांनी ग्रामीण जीवनमान उंचावले आहे.

**ना.अजितदादांकडून बीड....**

क्षीरसागर सातत्याने शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. त्यातच शुक्रवारी (दि.१५) रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार स्वातंत्र्यदिन ध्वजारोहण कार्यक्रमास आले असता जिल्हाधिकारी कार्यालयात एक बैठक पार पडली. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील रस्त्यांच्या बाबतीत चर्चा करून शहरात रस्ते व नाली होण्यासाठी निधीची गरज असल्याचे सांगितले. त्याची ना.अजित दादांनी तात्काळ दखल घेत तातडीने १०० कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात येणार असल्याचे सांगितले. रस्ते आणि नाल्यांच्या दुरावस्थेमुळे होणार्या त्रासातून बीडकरांची सुटका करण्यासाठी आणि बीडला विकासाकडे घेऊन जाण्याच्या मार्गावर आणखी एक पाऊल उचलल्यामुळे मी ना.अजित दादा पवार साहेबांचे मन:पूर्वक आभार मानत असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

**बीड शहरातील १५.....**

प्रकल्पांसाठी १५९ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. यापैकी २ रस्त्यांची कामे इतर योजनेतून पूर्ण झाली असून, आता उर्वरित १५ कामांसाठी नव्याने सुमारे १०० कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. अजितदादा पवार स्वतः निधी वितरणाबाबत बैठक घेणार असून, त्यानंतर मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होईल. याशिवाय, शहराच्या विकासासाठी अलीकडेच ५ कोटी रुपये घंटागाड्यांसाठी, ७.५० कोटी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी, तसेच ६ कोटी टॅक्स सर्व्हेसाठी मंजूर झाले आहेत. दरम्यान, बीड मतदारसंघासाठी भरघोस निधी दिल्याबद्दल ना.अजितदादा पवार यांचे डॉ.क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

**संकटात संघर्षासाठी ...**

रामराव ढोक महाराज यांचे झाले. यावेळी प्रमुख उपस्थिती बीडच्या माजी खासदार डा. प्रीतमताई मुंडे, जि. प. अध्यक्षा सौ. सविताताई गोल्हार, डीवायएसपी संतोष खाडे यांची होती.

यावेळी संदेश सानप, राम सानप, प्राचार्य बी. टी. खाडे, विजय सानप, महेंद्र गर्जे, राजु खाडे, आश्रुबा सानप, संजय सानप, युवराज वायभासे, राजु पवने, सावरगाव येथील महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी ग्रामस्थांच्यावतीने डॉ. प्रीतमताई मुंडे यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे पुढे म्हणाल्या की, तुमच्याकडे येण्यासाठी कुठल्याही निमित्ताची किंवा निमंत्रणाची गरज नाही तुम्ही माझी माणसं आहात लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे भगवानबाबांचे स्मरण करायचे, आम्ही तीच परंपरा पुढे सुरू ठेवलेली आहे. संकटात भगवानबाबांचे स्मरण करतो. भगवानबाबांनी सद्बुद्धी दिली आणि दसरा मेळावा येथे झाला. हे वैशिष्ट्य विशद करताना खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी तुम्ही ज्या मागण्या केल्या या ठीक आहेत परंतु मागायची वेळ चुकली कारण मी कुठल्याही पदावर नाही तरी तुमची मागणी सरकारी दरबारी पोहोचवेल आणि ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल. भगवानबाबाची देखणी मूर्ती असून लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या आशीर्वादाने गावचा विकास नक्की होईल मी

पान १ वरून...

आत्तापर्यंत नितीन गडकरींना जेव्हा जेव्हा कामे सांगितले की, प्रत्येक काम त्यांनी केलेले आहेत. या रस्त्याच्या बाबतीत ही नंबर पाडून निधी आणून देईल असा विश्वास ही त्यांनी दिला. पुढच्या वर्षीच्या कार्यक्रमही संयोजकांनी असाच उत्तम पार पाडावा अशी अपेक्षाही त्यांनी शेवटी व्यक्त केली.

राष्ट्रसंत भगवान बाबांची जयंती राज्याने देशभर उत्साहात संपन्न झाली. संत भगवानबाबांनी सर्वसामान्य गोरगरिबांना शिक्षणाचा मंत्र दिला. शिक्षण माणसाचा उद्धार करू शकतो. हा त्यांनी दिला वसा आणि वारसा आज सर्व सामान्य कुटुंबातून चालवला जात आहे. भगवानबाबांचा हा जन्मोत्सव त्यांच्या जन्मस्थळ असलेल्या सावरगाव घाट येथे ही अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

**दैनिक समर्थ राजयोगच्या....**

असे एका तालुक्यातून दोन शिक्षक निवडले जाणार आहेत.

दिव्यांग, क्रीडा, आणि कला शिक्षकांसाठी विशेष पुरस्कार...

जे शिक्षक दिव्यांग आहेत,प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शाळेत ज्ञानदानाचे समर्पित काम करतात अशा आदर्श शिक्षकांमधील दिव्यांग, कला आणि क्रीडा क्षेत्रातील शिक्षकाची विशेष निवड केली जाईल. असे तीन विशेष पुरस्कार राज्यस्तरीय आदर्श शिक्षक म्हणून दिले जाणार आहेत. यासाठी पात्र असलेल्या दिव्यांग, कला आणि क्रीडा क्षेत्रातील शिक्षकांनी या पुरस्कारासाठी आपले संपूर्ण प्रस्तावासह अर्ज सादर करावेत.

आदर्श पुरस्कारासाठी शिक्षकांनी कुठे आणि कशी नोंद करावी.?

बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षक या पुरस्कारासाठी पात्र असतील. विशेष बाब म्हणजे इतर मागास बहुजन कल्याण विभाग अंतर्गत चालवण्यात येणाऱ्या निवासी, अनिवासी आश्रम शाळेतील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांना विशेष बाब म्हणून राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

या पुरस्कारासाठी इच्छुक शिक्षकांनी आजपर्यंत केलेले शैक्षणिक, सामाजिक कार्य, त्या त्या घटनेच्या फोटोसह आणि पुराव्यानुसार फाईल तयार करून आपल्या संपूर्ण बायोडेटामध्ये परिचयासह राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी आपला अर्ज २० ऑगस्ट २०२५ च्या आत संपादक,दैनिक समर्थ राजयोग, सम्राट चौक, शाहूनगर कॉर्नर, बस स्थानकाच्या पाठीमागे, बीड. तालुका जिल्हा, बीड ४३ ११ २२ या ठिकाणी प्रत्यक्ष अथवा ऑन लाईन व्हॉट्स अप नंबर ७० ३० १४ ९३ २२ यावर नोंद करावी. काही अडचण असल्यास अधिक माहितीसाठी ९८ २२ ६२ ८५ २१ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन संपादक, वैभव स्वामी यांनी केले आहे.

**चोरीतील आरोपी ...**

संभाजीनगर येथे दि. १४/०८/२०२५ रोजी गु.र.नं. १६४/२०२५ कलम ३०३(२) इछड अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पो. नि. ढोणे यांचे आदेशाने सदर गुन्ह्याचा तपास सफौ, ६१३ सौंदनकर यांचेकडे देण्यात आला.

गुन्ह्याचे संदर्भात व फिर्यादी हा जेष्ठ नागरीक असलायने मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे व मा. अ.पो.अ. श्रीमती तिडके मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीयपोलीस अधिकारी श्री. शिंदे यांचे सुचने प्रमाणे परळी शहरात नविन अद्यावत बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेरेच्या फुटेजच्या आधारे तसेच सायबर सेल यांची तांत्रीक मदत घेवुन सदर गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचा शोध घेतला असता सदरचा गुन्हा आरोपी नामे प्रकाश श्रीराम जाधव वय ३४ वर्षे रा. हिवरसिंगा ता. शिरूर जि. बीड याने केला असल्याचे निषपन्न झाल्याने पो.स्टे. संभाजीनगर डी. बी. पथक यांनी खोकर मोहा ता. शिरूर जि. बीड येथुन आरोपीला ताब्यात घेवून नमुद आरोपीकडे सखोल तपास करून त्याचेकडून सोन्याचा गोप वजन २५ ग्रॅम किं. अंदाजे २,५०,०००/ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गुन्ह्याची पुढील कार्यावाही चालु आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक डी. एस. ढोणे, ग्रेपोउपनि मिसाळ, सफौ/६१३ सौंदनकर, व डी.बी. पथकातील सफौ /१२५३ नागरगोजे, पोह/४१६ साजीद पठाण, पोअ./७१० चव्हाण, पोअं. १७२१ डोंगळे, पोअं. ११०९ घुगे सर्व पो.स्टे. संभाजीनगर यांनी प्रभावीपणे कामगिरी बजावली आहे.

# बीड जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत अॅड. सुभाष पिसोरे यांच्या पॅनलचा दणदणीत विजय

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा वकील संघाच्या दिनांक ११ ऑगस्ट सोमवारी रोजी झालेल्या निवडणुकीत सुरुवातीपासूनच वर्चस्व जड असलेल्या ड.सुभाष पिसोरे (आप्पा) यांच्या पॅनलच्या सर्व उमेदवारांचा दणदणीत विजय झाला. त्यांचे प्रतिस्पर्धी पॅनलला दारूण पराभव पत्करावा लागला आहे.



बीड जिल्हा वकील संघासाठी आज सकाळपासून मतदानाला सुरुवात झाली एकूण ८०३ मतदारांपैकी ६८८ मतदारांनी मतदान केले.अध्यक्ष पदासाठी ड.सुभाष पिसुरे-४१६ (विजयी), ड.गणेश करंडे-२२, ड. प्रशांत देशपांडे-२३७,नोटा/बाद-११, ड. सुभाष पिसुरे-१७९ मतांनी विजयी झाले. उपाध्यक्ष पदासाठी ड.रघुराज देशमुख (विजयी) ४७६, ड.शहादेव भंडारे-३४, ड.संग्राम तुपे-१६०, नोटा/बाद-१८, ऍड.रघुराज देशमुख ३१६ मतांनी विजयी.सचिव पदासाठी ड. सुभाष काळे- ४४६ (विजयी), ड. किशोर खेडकर- २१४, नोटा/बाद २९ ड. सुभाष काळे २३२ मतांनी विजयी महिला प्रतिनिधी ड. मनीषा गडकर (विजयी) ४१४ तर ड. बबीता पळसेकर २४५, नोटा/बाद २९ ड. मनीषा गडकर १६९ मतांनी विजयी. ग्रंथपाल सचिव पदासाठी ड. सय्यद अजीम -३४८ (विजयी), ड. मच्छिंद्र ससाणे-१८७, ड. राहुल सूर्यवंशी-११२,नोटा/बाद-४१, ड. सय्यद अजीम १६१ मतांनी विजयी. कोषाध्यक्ष पदासाठी ड. योगेश टेकाळे-४२४ (विजयी), ड. दिनेश नाटकर-२३६, नोटा/बाद-२८ ड. योगेश टेकाळे १८८ मतांनी विजयी.सहसचिव पदासाठी ड. धीरज कांबळे-४३४ (विजयी),ड.शेख फेरोज-२१० , नोटा/बाद-४४, ड. धीरज कांबळे २२४ मतांनी विजयी.विजयानंतर ड. सुभाष पिसुरे समर्थकानी विजयी मिरवून काढली तर माने कॉम्प्लेक्स परिसरात आतिषबाजी करण्यात आली.जाणीव प्रतिष्ठानचे अध्यक्ष व जेष्ठ वकील ड विवेकानंद सानप, ड.हनुमंत शिंदे,अनंत खेडकर, ड. राम काशीद, तुकाराम पवार-ठाकूर, ड.अविनाश काळे, रोहिदास घोडके, आदींनी अभिनंदन केले आहे.

## बीड जिल्हा वकील संघाच्या अध्यक्षपदी अॅड. सुभाष पिसोरे यांची निवड झाल्याबद्दल

## दैनिक समर्थ राजयोग आणि पत्रकार संघाच्या वतीने अभिनंदन करतांना वैभव स्वामी

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत ड.सुभाष पिसोरे (आप्पा) यांच्या पॅनलच्या सर्व उमेदवारांचा दणदणीत विजय झाला. या विजयाबद्दल अध्यक्ष पिसोरे अप्पा यांच्या टीमचे अभिनंदन करून पुढील विधायक कार्य करण्यासाठी दैनिक समर्थ राजयोग आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने शुभेच्छा देताना संपादक तथा प्रदेश संपर्कप्रमुख वैभव जगदेवी विवेक स्वामी.



बीड जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत अध्यक्ष पदासाठी ड.सुभाष पिसुरे भरघोस मतांनी विजयी झाले.त्यांच्या पॅनल मधील सर्वश्री उपाध्यक्षपदी ड.रघुराज देशमुख,सचिवपदी ड. सुभाष काळे,महिला प्रतिनिधीपदी ड. मनीषा गडकर,ग्रंथपाल सचिवपदी ड. सय्यद अजीम, कोषाध्यक्षपदी ड. योगेश टेकाळे, सहसचिवपदी ड. धीरज कांबळे विजयी झाले.या दणदणीत विजय मिळवलेल्या पॅनेलचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी.यावेळी उपस्थित ज्येष्ठ अँड.विलास जोशी,अँड.म्हेत्रे सर,अँड.ठोंबरे, सूर्यवंशी सर आदी.

## महाराष्ट्र विधानपरिषद सभापती राम शिंदे यांचा दौरा कार्यक्रम

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषद सभापती राम शिंदे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. दिनांक १७ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता शासकीय विश्रामगृह अहिल्यानगर येथून शासकीय वाहनाने पिंप्री (घुमरी) ता. आष्टी, जि. बीड कडे प्रयाण. सकाळी ८.३० वा पिंप्री (घुमरी) ता. आष्टी, जि. बीड येथे आगमन व श्रीमती अश्विनी देवराव परकाळे यांची यु.पी.एस.सी. मध्ये खत्रड पदी निवड झाल्याबद्दल पिंप्री घुमरी ग्रामस्थांच्या वतीने आयोजित भव्य नागरी सत्कार सोहळ्यास उपस्थिती. सकाळी ९.३० वा. पिंप्री (घुमरी), ता.आष्टी, जि.बीड येथून शासकीय वाहनाने ता.कर्जत, जि.अहिल्यानगरकडे प्रयाण.

## माध्यमिक विद्यालय दहिपुरी शाळेची व्हॉलीबॉल स्पर्धेत जिल्हास्तरावर धडक

अंबड:वार्ताहर (दि.१६)

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झालेल्या अंबड तालुका स्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर दहिपुरी ता. अंबड या शाळेने १९ वर्ष वयोगट मुलीच्या संघाने बाजी मारून जिल्हास्तरावर धडक मारलेली आहे. या खेळाडूमध्ये



गायत्री सपकाळ,जया बागडे, प्रतीक्षा रांजणे, पूजा मोरे, राणी तोगे,साक्षी लिहिणार,प्रतीक्षा लिहिणार,प्रतीक्षा मोरे इत्यादी खेळाडू खेळामध्ये सहभागी होते. त्यांच्या या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष श्रीयुत चंद्रमणीजी खरात, संस्था सचिव अमोल भैय्या खरात, मुख्याध्यापक दिनेश ठाकूर, शिक्षकवृंद सर्वश्री प्रेमदास राठोड, हकीम पटेल, परमेश्वर उगले, सचिन आंबेडकर, बालासाहेब ढेंबरे, अजित खरात, श्रीमती प्रतिज्ञा पनाड, किशोर शिंगणे, श्रीमती मयुरी चौधरी, शुभम राठोड, लिहिणार, खरात व सर्व गावकऱ्यांनी खेळाडूंचे कौतुक व अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक श्री हकीम पटेल यांचं मोलांचे मार्गदर्शन लाभले.




बीड - जिव्हाळा परिवाराचे स्नेही, जिव्हाळा परिवाराला सतत मदतीचा हात देणारे, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक, तथा प्रदेश संपर्क प्रमुख, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे वैभव स्वामी यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे यांना वाढदिवसाच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपस्थित सर्व अनाथ बेघर लाभार्थी परिवार.

## मराठवाड्यातील पहिले तालूकास्तरीय प्लास्टिक कचरा संकलन व प्रक्रिया केंन्दाचे पालकमंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन

बदनापुर (प्रतिनिधी)जालना जिल्ह्यातील बदनापूर पंचायत समिती येथे आज स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा क्र.२ अंतर्गत मराठवाड्यातील पहिले तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा संकलन व प्रक्रिया केंद्राचे महाराष्ट्र राज्याचे पर्यावरण मंत्री तथा जालना पालकमंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उदघाटन करून उपस्थितांशी संवाद साधला.

हे केंद्र ग्रामीण भागातील स्वच्छतेसाठी आणि प्लास्टिक कचरा समस्येवर उपाय शोधण्यासाठी मदत करेल. प्लास्टिक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावल्याने पर्यावरण संरक्षण आणि आरोग्य सुधारण्यास मदत होते.

यावेळी भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायण कुचे जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम, श्री. भास्कर दानवे, शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.भाऊसाहेब घुगे, बद्रीनाथ पठाडे, नगरसेवक गोरख खैरे, जगन्नाथ बारगाजे, अकोला नि सरपंच श्रीमती मुक्ताबाई गीते, यांच्यासह मान्यवर आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.



## जिल्हा स्तरीय कॅरम स्पर्धेत कु.श्वेता खरात हिची निवड

जाफ्राबाद/प्रतिनिधी

जाफराबाद दि.१४ क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे एक व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सिद्धार्थ महाविद्यालय जाफ्राबाद आयोजित तालुकास्तरीय कॅरम स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये ज्ञानसागर प्राथमिक विद्यालय जाफ्राबाद या शाळेची विद्यार्थीनी कु. श्वेता अशोक खरात हिने तालुका स्तरावर उत्कृष्ट खेळी खेळत विजय मिळवत जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. या यशाबदल विश्वशांती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुरेशजी दिवटे,प्राचार्य निवृत्ती दिवटे,मुख्याध्यापक भगवान कोल्हे, तालुका संयोजक प्रा. वाहेद पटेल ,प्राचार्य डॉ.रमेश देशमुख,प्रा.अनिल वैद्य,




क्रीडाशिक्षक गणेश भोपळे, बाबासाहेब दिवटे,समाधान टेकाळे,भास्कर जाधव,भगवान शिराळे,उज्वला वायाळ,स्मीता मोरे,कौशल्या वीरे,पेद्दी मॅडम, न्यु हायस्कूल मुख्याध्यापक मुरकुटे सर ,सोनवणे आदींनी अभिनंदन केले.

## वैद्यकीय पेशाला सेवाधर्म मानणारे डॉ. जाधव दांपत्य- सौ. जयश्रीताई विधाते

बीड /प्रतिनिधी

आज डॉ. अजित आणि डॉ. सुहासिनी जाधव यांच्या माऊली कृपा क्लिनिकच्या वर्धापन दिना निमित्त भव्य मोफत स्त्री-आरोग्य तपासणी शिबीराच आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रभागाच्या नगरसेविका सौ. जयश्रीताई विलास विधाते या लाभल्या होत्या.



तर प्रमुख पाहुण्या म्हणून जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा वर्षाताई माने तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा प्रा. संगीताताई शिंदे, योगगुरु डॉ. राधाताई तांबे,डॉ.संजीवनीताई देसाई डॉ. वैशालीताई खाडे,श्रीमती उल्काताई जाधव यांची उपस्थिती लाभली होती. या शिबीरात श्री व सौ. जाधव आणि यांच्या सहकारी डॉक्टर सुप्रसिद्ध स्त्रीरोग व वंध्यत्व निवारण तज्ज्ञा डॉ. सीमाताई वाघमारे आणि डॉ. शितलताई भोपळे यांनी स्त्री- आरोग्य किशोरवयीन मुलींचे आरोग्य, मासिक पाळी, गर्भधारणा, प्रसूती, वंध्यत्व,ऋतुचक्र, रजोनिवृत्ती, स्तनाचा-गर्भाशयाचा कॅन्सर, लसीकरण, घ्यावयाची काळजी उपाय योजना याच बरोबर मूळव्याध, फिशर, मधुमेह, पॅरॅलिसिस, मेंदुविकार, त्वचा व केसाच्या समस्या यावर मार्गदर्शन आणि मोफत तपासण्या औषधोपचार केले.तर

आपल्या अध्यक्षीय भाषणात विधातेताई यांनी स्त्री आरोग्याची होणारी हेळसांड यासाठी जनजागृतीचा अभाव, अर्थिक- सामाजिक परिस्थिती, आधुनिक तंत्रज्ञान यावर भाष्य करत एकाच छताखाली तज्ज्ञ डॉक्टरांना एकत्रित करुन सेवा सुविधा देत डॉक्टर हा फक्त पेशा नसुन सेवाव्रत आहे या जाणिवेतून करत असलेल्या कौतुकास्पद कामाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.या शिबीराचा बीड शहरातील शेकडो भगीनींनी लाभ घेतला.



बीड - सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त इंजिनिअर सय्यद अकबर अहमद यांच्या डॉ.अंजुम यांचा निकाह डॉ. शहबाज शेख यांच्या समवेत अमन लॉन्स येथे नुकताच थाटामाटात संपन्न झाला.यावेळी दूल्हेसाहब यांना निकाह च्या शुभेच्छा देताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या सह ज्येष्ठ पत्रकार गुलदाद खान पठाण, सहशिक्षक ताज मुलानी, अक्तर खान आणि इनामदार साहब.



## जिल्हा परिषदेत सीईओ जितीन रहमान यांच्या हस्ते ध्वजारोहन

बीड (प्रतिनिधी):

येथील बीड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात भारतीय स्वातंत्र्याचा ७९ स्वतंत्रदिन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या शुभहस्ते ध्वजारोहन करून साजरा करण्यात आला.

यावेळी सामुहिक राष्ट्रगीत गायनानंतर देश भक्तीगीत सादरीकरण करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना स्वतंत्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक सांगितादेवी पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, किशोर काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, जिल्हा बालविकास अधिकारी मनोज ससे, शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (मा.) प्रियाराणी पाटील, कार्यकारी अभियंता मोमीन आदी विभाग प्रमुखांसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




## कानिफनाथ महाराष्ट्र शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जाफराबाद येथे विभाजन विभिषीका स्मृती दिवस साजरा

जाफराबाद प्रतिनिधी

जाफराबाद दि.१४रोजी कानिफनाथ महाराष्ट्र शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जाफराबाद येथे विभाजन विभीषीका एक अविस्मरणीय दिवस या विषया वर माननीय मंगल प्रभात लोढा साहेब मंत्री कौशल्य विकास व उद्योजक्ता नाविन्यता विभाग महाराष्ट्र यांच्या संकलपने तून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे गट निदेशक श्री जेडी चौतमल हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. जी.आर गोफणे सर व श्री व्ही डी लोखंडे साहेब सदस्य आयएमसी आय टी आयी जाफराबाद हे होते. तसेच प्रमुख वक्ते म्हणून श्री सुनील नायकवाडी शिल्प निदेशक आय टीआय जाफराबाद हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.खिल्लारे सी टी यांनी केले तसेच प्रा. जी.आर गोफणे सर विभाजन विभाषीका विषयावर मार्गदर्शन करत त्यांनी भारत देशासाठी हुतात्म्याची योगदान आणि समर्पण भावना यावर मार्गदर्शन करत त्यांनी देशांमध्ये एकता आणि अखंडता राहण्यासाठी सर्वांनी धर्मनिरपेक्षता बाळगण्याचे आवाहन केले तसेच श्री सुनील नाईकवाडी यांनी दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी कानिफनाथ महाराष्ट्र शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जाफराबाद येथे विभाजन विभीषीका विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले कार्यकामाचे अध्यक्ष श्री जी डी चौतमाल यांनी अध्यक्षीय भाषण करून शिल्प निदेशक श्री.आर के टेकाळे यांनी आभार व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जे बी राठोड यांनी केले. राष्ट्रगिता ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली तसेच कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी संस्थेचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सौ.चित्रा पेंढारकर , सौ.चक्रवर्ती खिल्लारे , गजानन लांबे, भाऊसाहेब वाकेकर , अमोल दळवी अमोल गावंडे , उबेद् शेख, विजय फदाट , चंद्रकांत दांडगे , सहाने , सचिन राऊत , संदीप गवई अदींची व संस्थेतील सर्व व्यवसायचे प्रशिक्षणार्थी उपस्थिती होती.

# आज बीड जिल्हा पोलीस दलामार्फत नशामुक्ती जनजागृती मॅरेथॉनचे आयोजन

बीड प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने नशामुक्त समाज - सुरक्षित भविष्य या संकल्पनेखाली मॅरेथॉन स्पर्धेचे आज आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट समाजामध्ये नशामुक्तीबाबत जनजागृती घडवून आणणे तसेच युवकांना व्यसनमुक्त जीवनशैलीकडे प्रेरित करणे हे आहे.

या मॅरेथॉनमध्ये बीड शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिक, प्रतिष्ठित व्यक्ती, समाजसेवक, पोलीस कर्मचारी, पत्रकार बंधू तसेच विद्यार्थी व युवक यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत साहेब यांनी केले आहे.

मॅरेथॉनचे ठिकाण

छत्रपती संभाजीराजे क्रीड़ांगन बीड

दिनांक : १७ ऑगस्ट २०२४

वेळ : सकाळी ५:०० वा.

नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन नशामुक्त समाज निर्मितीसाठी योगदान द्यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

पोलिसांचे पत्रकार बांधवांना आवाहन...

सर्व पत्रकार बांधव यांना कळविण्यात येते की, अंमली पदार्थ विरोधी सप्ताह च्या अनुषंगाने नशामुक्त बीड अभियान राबविण्यात येत आहे. त्या निमित्ताने दिनांक १७/०८/२०२५ रोजी सकाळी ०५:०० वा. पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कॉंवत यांचे संकल्पनेतून जनजागृतीपर ५ कि.मी. व १० कि.मी. मॅरेथॉनचे आयोजित करण्यात आले आहे. सदरची मॅरेथॉन छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथून सुरु होणार आहे. तरी सर्व पत्रकार बांधवांनी मॅरेथॉनचे कव्हरेज घेण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे ०५:३० वा. येण्याचे करावे असे आवाहन पोलीस दलाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कळंबअंबा येथील शेतकऱ्यांचे रायपर कंपनीचे किटकनाशक फवारणी केल्यामुळे सोयाबीन करपले

## कंपनी कडून शेतकऱ्यांला नुकसान भरपाई द्यावी व तात्काळ पंचनामा करावा शेतकऱ्यांची मागणी



केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील कळंबअंबा येथील मारोती तुकाराम ढवारे यांनी आडस येथुन पतंगे कृषी सेवा केंद्र येथून सोयाबीन फवारणीसाठी जयकिसान कंपनीचे रायपर हे किटकनाशक ची फवारणी केली असता सोयाबीन पिवळे होऊन करपले.त्यामुळे २५ एकर वरील सोयाबीन पिकाचे नुकसान झाले आहे तरी शेतकरी मारोती तुकाराम ढवारे यांनी सदरील सोयाबीन पिकाची तक्रार तहसील कार्यालय,तलाठी कार्यालय,कृषी कार्यालय येथे केली आहे तरी पण कोणत्याही कार्यालयाचा सरकारी कर्मचारी पाहणी करण्यासाठी आला नाही तरी शासनाने तात्काळ अधिकारी पाठवुन पिकांचा पंचनामा करावा व जयकिसान कंपनीच्या रायपर कंपनी वर कार्यवाही करून कंपनी कडून शेतकऱ्यास नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्याने केली आहे.



# प्रतिबंदीत गुटका बाळणारा पोलिसांच्या जाळ्यात

परळी / प्रतिनिधी

बीड एलसीबी स्थानिक गुन्हे शाखा पथकाने परळी तालुक्यात पेट्रोलिंग करत असताना एक इसम महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा घेऊन जात असताना छापा टाकला असता त्याच्या ताब्यातून वेगवेगळ्या कंपनीचा पान मसाला व गुटखा त्याच्या गाडीतून जप्त करण्यात आला सदरील कारवाई तालुक्यातील नंदागौळ या ठिकाणी करण्यात आली.

पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार बीड एलसीबी स्थानिक गुन्हे शाखा पथकाचे डी वाय एस पी शिंदे, पोलीस राजकुमार मुंडे, रामचंद्र केकान, गोविंद भताने, सचिन आंधळे, राजकुमार मुंडे परळी तालुक्यातील नंदागौळ या परिसरात पेट्रोलिंग करत असताना आरोपी अरबाज बशीर शेख (रा पेट. मोहल्ला,परळी) व बिया (पूर्ण नाव माहिती नाही) हे दोघे त्यांच्या वाहनांमध्ये राज्यात प्रतिबंधित असलेला पान मसाला व गुटखा घेऊन जाताना जाळ्यात अडकले.या कारवाई मध्ये ६ लक्ष १५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून ही कारवाई शनिवार दि १६ रोजी सायंकाळी ५ च्या दरम्यान करण्यात आली. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# जिल्ह्यात अतिवृष्टीने पिकांसह शेतीचे नुकसान,तातडीने पंचनामे करा

## खा.बजरंग सोनवणे यांचे चौफेर लक्ष, पंचनाम्यासाठी जिल्हाधिकारी यांना दिले तातडीने पत्र



बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात दि.१५ ऑगस्ट रोजी पहाटे जिल्ह्यातील जवळपास १७ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाली असून याठिकाणी पिकांसह शेतीचेही नुकसान झालेले आहे.अनेक ठिकाणी शेती खरडून गेलेली असून जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत,असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

मागील चार दिवसां पासून जिल्ह्यात पाऊस हजेरी लावत असून दि.१५ ऑगस्ट रोजी पहाटे पावसाने जिल्ह्यात हाहाकार केला आहे. जिल्ह्यातील बीडतालुक्यातील पाली, नाळवंडी,चौसाळा, नेकनूर,लिंबागणेश, पाटोदा तालुक्यात पाटोदा,थेरला,गेवराई तालुक्यात धोंडराई, रेवकी,तलवाडा,केज तालुक्यातयुसूफवडगाव,बनसारोळा,नांदूरघाट, परळी तालुक्यात नागापूर,सिरसाळा, शिरूर तालुक्यातील तिंतरवणी,ब्रम्हनाथ येळंब या महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे.याच बरोबर दि.१६ ऑगस्ट च्या रात्रीही पावसाने हजेरी लावली असून इतर अनेक ठिकाणी सुद्धा पिके पाण्यात आहेत.तर काही ठिकाणी नदीचे पात्र ओलांडून पाणी शेतात शिरले आहेत.केज तालुक्यातील मांजरा नदी दुथडी भरून पाहत असून राजेगाव, दैठणा,बोरगाव,भोपला, हदगाव,डोका व लाखा या सात गावासह संपूर्ण मांजरा पट्ट्यातील गावे क्षतीग्रस्त झालेली आहेत.शेतीच्या नुकसानी सोबतच घरांची पडझड झाल्याच्या घटना घडल्या आहेत.नदीपात्र ओलांडून पाणी पिकात व गावांत शिरले आहे. यामुळे पिकांचे,शेतीचे आणि रहिवाशीघरांचेही नुकसान झालेले आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्वच भागात जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे,शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे आवश्यक असून नुकसानग्रस्त भागात तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांमार्फत पंचनामे करुन शासनाकडे नुकसान भरपाईसाठी प्रस्ताव सादर करावेत,असेही खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे.

# पुणे शहरातील आ.सुरेश धस यांच्या आभार दौऱ्यास उपस्थित रहा - बंडु साहेब तोडकर,बंटी सगळे



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघातील नागरीक पुणे शहरातील विविध भागात कामानिमित्त आलेल्या मतदारसंघ वासीयांचे आभार व्यक्त करण्यासाठी आ. सुरेश धस रविवार दि. १७ ऑगस्ट रोजी येणार आहेत. या आभार दौऱ्यासाठी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बंटी शेठ सगळे, बंडुसाहेब तोडकर, शहादेव चौधरी यांनी केले आहे.

मराठवाड्यातील आष्टी, पाटोदा, शिरूर मतदारसंघातील जनतेच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आमदार सुरेश धस हे पुणे शहरातील चिंचवड येथे येत आहेत. रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वा. आहेर गार्डन, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे येथे जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमात मतदारसंघातील विकासकामे आणि जनतेच्या अपेक्षांबाबत चर्चा होईल. स्नेह मेळावा घेऊन आभार मानणार आहेत.

आ. सुरेश धस यांनी नेहमीच जनतेच्या हिताला प्राधान्य दिले असून, त्यांच्या या भेटीमुळे पुण्यातील मराठवाड्याच्या जनतेशी त्यांचा संवाद अधिक दृढ होईल अशी अपेक्षा आहे. पुणे शहरात रहिवाशी असलेल्या सर्व जनतेने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन बंडु साहेब तोडकर, शहादेव चौधरी, कुमार कोकणे, गणेश कदम, वलवळे राजेंद्र, अनिल टेकाळे, बंटी सगळे, इंद्रजित पवार यांच्यासह पुणे शहरातील प्रमुखांच्या वतीने करण्यात येत आहे.

# खडकत ग्रामस्थांची पाण्यासाठी एकजूट;आ.सुरेश धस यांच्याकडून ग्रामस्थांच्या कार्याचे कौतुक



आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील खडकत येथे दरवर्षी दिवाळीनंतर भेडसावणाऱ्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी दाखविलेली ऐक्यभावना आणि स्वयंस्फूर्तीचे प्रयत्न हे खरोखरच कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी आपल्या भेटी दरम्यान केले.

खडकत गाव हे सीना नदी शेजारी असूनही पावसाळ्यानंतर पाणी साठवणुकीची सोय नसल्याने गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी गंभीर समस्येला सामोरे जावे लागते. या प्रश्नाच्या मूळ उपाययोजनेसाठी शासनस्तरावर अंदाजपत्रक तयार झाले असले तरी खर्चाच्या प्रचंड आकारामुळे योजना अद्याप मंजूर होऊ शकली नाही. अशा कठीण परिस्थितीत गावातील सरपंच शांतीलाल काटे, गुलाब जेवे, बंटा जाधव, शिवाजी जेवे, अप्पासाहेब जाधव या ग्रामस्थांनी स्वखर्चाने नदीतील पाणी उचलून साठवण बंधाऱ्यात वळविण्याची तात्पुरती सोय केली. ग्रामस्थांच्या या लोकहितवादी उपक्रमाची शनिवारी आमदार सुरेश धस यांनी पाहणी करत विशेष कौतुक केले. मूळ योजना शासनाकडून मंजूर होण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करत असून यात कुठेही कमी पडणार नाही असा विश्वास आ. सुरेश धस यांनी ग्रामस्थांना दिला. यावेळी योगदान देणाऱ्या ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी ह. भ. प. जाधव महाराज, सभापती बद्रीनाथ जगताप, माजी सभापती दत्तात्रय जेवे, विजय भोस्टे, प्रा. तात्यासाहेब जेवे, संजय जेवे, दादासाहेब बळे, भीमराव बळे, विठ्ठल तोरणमाल सर यांच्यासह खडकत व बळेवाडी येथील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. सुरेश धस यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी

मतदारसंघाचे लोकप्रिय आ. सुरेश धस आणि गावातील शेतकऱ्यांच्या सहकार्याने गावतुन जात असलेल्या सीना नदीतुन एका पाझर तलावात दोन मोटारी टाकून पाणी उपसा केले. कमी खर्चात हा प्रयोग यशस्वी होत असून संपूर्ण गाव या उपक्रमामुळे बागायती होणार आहे. या उपक्रमामुळे खडकत गावचा पाणी टंचाई चा दरवर्षीचा मोठा प्रश्न मार्गी लागला असुन येणाऱ्या काळात असाच आणखी एक प्रयोग आम्ही करणार असून आ. सुरेश धस याची पाहणी करून याबाबत शासन दरबारी पाठपुरवा करून तात्काळ मार्ग काढू असे आश्वासन दिले असून यामुळे अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आमचा मार्गी लागणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. ग्रामस्थांनी आ. सुरेश धस यांचे आभार मानले जात आहे. दत्तात्रय जेवे, माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती कडा.



# धनेगाव येथे कु.श्रावणी गुजर हिचा ऋषिकेश आडसकर यांच्या हस्ते सत्कार संपन्न

केज/प्रतिनिधी

दि.१६ आगष्ट २०२५ रोजी धनेगाव येथील मा.सरपंच श्री.सुहास गुजर यांची कन्या कु. श्रावणी सुहास गुजर ही विध्यार्थीनीची नांदेड शासकीय महाविद्यालय येथे B.D.S या शिक्षणा साठी पात्र झाल्यामुळे कु.श्रावणी हिस शाबासकीची थाप देत पुष्प देऊन अभिनंदन करताना,अंबेजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्री.ऋषिकेश भैय्या आडसकर तसेच मा. सरपंच सतिष गुजर, चेअरमन विकास पाटील,कृषी बाजार

समितीचे संचालक पशुपती पाटील,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामकिसन बाबा खोडसे,शिवदास थळकरी,रघुनंदन मोरे, बाळासाहेब नांदे, धनेश्वर गुजर,शंकर इंगळे,शाम खोडसे,गजानन गोरे,विशाल खोडसे,अमरदीप शिंदे आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बस स्थानकातून चोरी गेलेले ऐवज प्राप्त सीसीटीव्ही मदतीने पोलिसांची दमदार कार्यवाही




परळी / प्रतिनिधी

परळी शहरातील शंकर पार्वती नगर येथील सेवानिवृत्त जेष्ठ नागरिक असलेल्या व्यक्तीची परळी बस स्थानकातून सोन्याचा ऐवज लंपास झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पोलिसांनी सीसीटीव्ही मदतीने चोरट्यांचा यशस्वी पाठलाग करत मुद्देमाल हस्तगत केला.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार नाथराव माणिकराव फड ( वय ६७ वर्षे व्यवसाय - सेवानिवृत रा. शंकर पार्वती नगर) यांनी पोलीस स्टेशन संभाजीनगर परळी वै, येथे फिर्याद दिली होती की, दि. १३ ऑगस्ट रोजी १०.५५ वा. चे दरम्यान परळी बस स्थानक येथुन अंबाजोगाई येथे जाण्यासाठी बस मध्ये चढत असताना त्यांचे गळ्यातील सोन्याचा गोप वजन २५ ग्रॅम सध्या किं. अंदाजे २,५०,०००/ रुपयेची सोन्याचा गोप कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरले बाबत. पो.स्टे. संभाजीनगर येथे दि. १४/०८/२०२५ रोजी गु.र.नं. १६४/२०२५ कलम ३०३(२) इछड अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पो.नि. ढोणे यांचे आदेशाने सदर गुन्ह्याचा तपास सफौ, ६१३ सौंदनकर यांचेकडे देण्यात आला.

गुन्ह्याचे संदर्भात व फिर्यादी हा जेष्ठ नागरीक असलायने मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे व मा. अ.पो.अ. श्रीमती तिडके मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीयपोलीस अधिकारी श्री. शिंदे यांचे सुचने प्रमाणे परळी शहरात नविन अद्यावत बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेरेच्या फुटेजच्या आधारे तसेच सायबर सेल यांची तांत्रीक मदत घेवुन सदर गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचा शोध घेतला असता सदरचा गुन्हा आरोपी नामे प्रकाश श्रीराम जाधव वय ३४ वर्षे रा. हिवरसिंगा ता. शिरूर जि. बीड याने केला असल्याचे निषपन्न झाल्याने पो.स्टे. संभाजीनगर डी.बी. पथक यांनी खोकर मोहा ता. शिरूर जि.बीड येथुन आरोपीला ताब्यात घेवून नमुद आरोपीकडे सखोल तपास करून त्याचेकडून सोन्याचा गोप वजन २५ ग्रॅम किं. अंदाजे २,५०,०००/ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गुन्ह्याची पुढील कार्यावाही चालु आहे. सदरची कामगीरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक डी. एस. ढोणे, पोउपनि मिसाळ, सफौ.सौंदनकर, व डी.बी. पथकातील नागरगोजे, साजीद पठाण, चव्हाण, डोंगळे, घुगे संभाजीनगर यांनी प्रभावीपणे कामगीरी बजावली आहे.

# अपघातात युवकाचा मृत्यू; कारण अस्पष्ट



परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील २५ वर्षीय वर्षीय युवक तालुक्यातील पांगरी येथे सिमेंट कॉंक्रीट मिक्सरवर काम करणाऱ्या व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना शनिवार दि १६ रोजी सायंकाळी ८ च्या सुमारास घडली. प्राप्त प्राथमिक माहितीनुसार परळी शहरातील अमेर अजमेर पठाण (वय २५ वर्ष रा बरकतनगर) मिक्सर ऑपरेटर पांगरी येथील काम करत असताना अचानक कशाचा तरी धक्का लागून नदी पात्रात पडून नदी पात्रात आलेल्या पाण्यात वाहून गेला. सदरील घटना शनिवार दि १६ रोजी सायंकाळी ८ च्या सुमारास घडली असून मयत व्यक्तीचे पार्थिव हे उपजिल्हा रुग्णालय परळी येथे आणले आहे.शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मयत अमेर पठाण हे विवाहित असून त्यांना २ अपत्य असल्याचे समजले असून त्याच्या या अपघाती निधनाने बरकत नगर परिसरात शोककळा पसरली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅंक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# पोलीस बांधवांना राख्या बांधून 'एकता फाऊंडेशन' ने जपले सामाजिक भान

मानूर । प्रतिनिधी

'वेदनेला फुंकर माणुसकीची' हे ब्रीदवाक्य घेऊन गेल्या दशकापासून कार्य करणाऱ्या एकता फाउंडेशन च्या वतीने वेळोवेळी समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येतात. वृक्षरोपण, रक्तदान शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप, अनाथांना अन्न-धान्य वाटप, मराठी साहित्य संमेलन, वंचितांना दिवाळी फराळ वाटप, आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या कुटुंबियांना अन्न-धान्याची मदत, शालेय विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, चरित्र लेखन स्पर्धा, काव्य कोजागिरी, रोग निदान शिबीर, राज्यस्तरीय पुरस्कार वितरण, महाराष्ट्राची लोकधारा याबरोबरच अनेकविध उपक्रमांचा यात समावेश



आहे.

एकता फाउंडेशन महिला आघाडीच्या वतीने केंद्रीय कार्यकारिणीतील सल्लागार एड.भाग्यश्री ढाकणे-चेमटे यांच्या पुढाकारातून शिरूर कासार येथील पोलीस ठाण्यात कार्यरत कर्मचाऱ्यांसह सहाय्यक पोलीस निरीक्षक मा.प्रविण आर.जाधव यांना रक्षाबंधनानिमित्त राख्या बांधण्यात आल्या. समाजातील अन्यायग्रस्तांसह महिला, भगिनींचे बंधू बनून अहोरात्र रक्षण करणाऱ्या पोलीस बांधवांना कोणत्याही सणाच्या दिवशी सुट्टी न घेता कर्तव्यावर हजर रहावे लागते. याचीच जाणीव ठेवत एकताच्या महिला आघाडीतील पदाधिकाऱ्यांनी पोलीस बांधवांना ठाण्यात जाऊन राख्या बांधल्या. फाउंडेशन ने राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे स.पो.नि.प्रविण जाधव यांनी कौतुक करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी एकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष, म.सा.प.शिरूर कासार चे अध्यक्ष तथा मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, महिला आघाडी प्रतिनिधी श्रीमती लता बडे-कराड, युवती आघाडी प्रतिनिधी कु.सानिका खेडकर, महिला पोलीस कर्मचारी श्रीमती तांदळे मॅडम, श्रीमती दोडके मॅडम, पांडुरंग खेडकर, सौ.पल्लवी खेडकर यांची उपस्थिती होती.

# केज पंचायत समिती मध्ये मोठ्या उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा

## बाल विवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेऊन सर्वांनी घेतली शपथ

केज/प्रतिनिधी

केज पंचायत समिती मध्ये मोठ्या उत्साहात ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.प्रथम महात्मा गांधी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून गुलाल,धूप लावून विनम्र अभिवादन करण्यात आले.श्री.अजयजी ढोकर कनिष्ठ प्रशासन अधिकारी,पंचायत समिती केज यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. आणि महाराष्ट्र माझा हे गीत गायन झाले आणि सर्वांनी बालविवाह प्रतिबंधक सामूहिक प्रतिज्ञा गावुन शपथ घेतली की,आपण कोणीही बालविवाह करणार नाही याची शपथ घेतली व समाजात जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेणार यावेळी मोठ्या प्रमाणात माजी सैनिक नागरिक सामाजिक क्षेत्रात



कार्य करणाऱ्या व्यक्तींचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्री.अजयजी ढोकर,विस्तारअधिकारी चौरे,रोडेवार,मुळे, मासूमदार,शेख,रासवे,येनकुळे,सरवदे,पटेल, राऊत,चव्हाण,बनकर मॅडम,केदार मॅडम, पवार मॅडम,कांबळे मॅडम,राऊत मॅडम, शेरेकर,पत्रकार विश्वास राऊत,घुले गुरुजी, किसन कदम सर्व कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी मिरवणूक संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या सप्तशतोकोतर सुवर्ण महोत्सवी ७२५ व्या जयंती निमित्त माऊलींची पालखी मिरवणूक आणि वारकरी सांप्रदायिक दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रा आणि दिंडीमुळे आष्टी शहर भक्तिमय झाल्याचे दिसून येत होते. या शोभायात्रेत आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस व नगरपंचायत चे मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार बाळ दत्त मोरे यांनी सहभाग झाले होते.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर ७२५ व्या सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त राज्यभरातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां, नगरपंचायत, नगरपरिषद या ठिकाणी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीची मिरवणूक आणि वारकरी संप्रदायाच्या जयघोषात दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आष्टी नगरपंचायत कार्यक्षेत्रामध्ये भाविकांच्या उत्साहात आणि भक्तिभावाने माऊलींचा भव्य पालखी सोहळा आयोजित करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत टाळकरी, वारकरी संप्रदायातील मंडळी तसेच नागरिक बंधू - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ज्ञानोबा माऊली आणि माऊली माऊली च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला. यावेळी हरिभक्त परायण अशोक भोसले महाराज यांच्या श्री संत नामदेव महाराज गुरुकुल पारगाव जोगेश्वरी येथील ३५ विद्यार्थ्यांनी या दिंडी सोहळ्यामध्ये सहभाग नोंदवला. आष्टी शहरातील श्री दत्त मंदिर येथून या पालखी सोहळ्यातील सुरुवात करण्यात आली आणि ही शोभायात्रा दत्त मंदिर गल्ली कसबा पेठ कुंभार गल्ली जैन मंदिर कमान वेस मार्गे मुख्य बाजारपेठ शनी मंदिर चौक येथून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये या शोभा यात्रेची सांगता झाली.

या पवित्र सोहळ्यात सहभागी होऊन माऊलींचे दर्शन घेत अनेक भाविक भक्तांनी



आत्मिक आनंदाचा अनुभव घेतल्याचे पहायला मिळाले असे प्रतिपादन आ. सुरेश धस यावेळी वारकऱ्यांशी संवाद साधताना केले. या शोभायात्रेत आष्टी नगरपंचायतचे अधिकारी, कर्मचारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# सुमेध (बप्पा) शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त मुकबधिर, ज्ञानप्रबोधिनी व नालंदा विद्यालयात शालेय साहित्य वाटप

केज/प्रतिनिधी

नगरसेवक सुमेध(बप्पा) शिंदे यांचा वाढदिवस म्हणजेच स्मृती दिन दिनांक १५ ऑगस्ट रोजी असतो त्या निमित्ताने त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त एल.एफ.सी. ग्रुप व सुमेध बप्पा शिंदे विचार मंच यांच्या वतीनेविविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिर,फुलेनगर, केज येथे शालेयसाहित्य वाटप व १० वाजता नालंदा विद्यालय, फुलेनगर,केज येथे शालेय साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न झाला. तसेच दुपारी ११.०० वाजता मुकबधिर शाळा उमरी (केज) येथे शालेय साहित्य व



फळ वाटप करण्यात आले. यानंतर उपजिल्हा रुग्णालय,केज येथेही फळ वाटपाचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमास जेष्ठ नेते हारूणभाई इनामदार नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, शाळेच्यामुख्याध्यापिका शिंदे मॅडम व सुर्यवंशी मॅडम नालंदा विद्यालय चे मुख्याध्यापक नंदकुमार मस्के, ज्ञानप्रबोधिनी शाळेचे मुख्याध्यापक दयानंद देशमुख सर तसेच शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते

या कार्यक्रमांना विवेक बनसोड,किरण जोगदंड अमोल मिसाळ,अशोक गायकवाड,अशोक धिवार,बाळा इनकर, सुहास समुद्रे,विनोद इनकर,गणेश गालफाडे, अभिजीत तुपारे,विकी लांडगे,प्रेम मस्के, आकाश शिंदे,संदेश ताकतोडे,लखन हजारे, रेवन आप्पा नखाते, पवन बनसोड,विकी लोखंडे,प्रवीण लांडगे, आदित्य मस्के,आदित्य जावळे,बाळा भांगे, शाहरूख पटेल,ओम शिनगारे,सूरज वैरागे, सोनू लष्करे,सोनू जोगदंड,प्रदीप गायकवाड,कुणाल पोळ आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन एल.एफ.सी.ग्रुप व सुमेध बप्पा शिंदे विचार मंच यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी दिवंगत सुमेध शिंदे यांच्या कार्याचा गौरव करत समाजोपयोगी उपक्रमांद्वारे त्यांची आठवण जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात भारतीय स्वातंत्र्यदिन,हर घर तिरंगा,घर घर तिरंगा व क्रांतीदिन विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपन्न

केज/प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे भारतीय स्वातंत्र्यदिन, हर घर तिरंगा,घर घर तिरंगा व क्रांतीदिन व्याख्यान,परिसंवाद, चर्चासत्र,ग्रंथप्रदर्शन आदी सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात संपन्न झाला.दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय स्वातंत्र्यदिन परिसंवाद,चर्चासत्र, व्याख्यान कार्यक्रम घेवून साजरा करण्यात आला.सर्वकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ.अंजना गोविंद गायकवाड या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच सौ.आशा शंकर शिंदे,ग्रामसेवक डि.एस.सरवदे,सुंदर गायकवाड,शिवाजी गायकवाड,दादासाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.पाऊस चालू असल्यामुळे वाचन कक्षातच ग्रंथ



प्रदर्शन घेण्यात आले.

सर्वप्रथम महात्मा गांधी, डॉ.राजेंद्र प्रसाद,पंडित जवाहरलाल नेहरू,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला सरपंच, उप सरपंच,ग्रामसेवक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.त्यानंतर परिसंवाद घेण्यात आला.यामध्ये उपसरपंच सौ.आशा शिंदे,ग्रामसेवक डि.एस. सरवदे,सुंदरगायकवाड, शिवाजी गायकवाड, दादासाहेब गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.ग्रंथ प्रदर्शनाचेही मान्यवरांनी कौतुक केले.त्यानंतर ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते,परखड व्याख्याते प्राचार्य डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड यांचे व्याख्यान झाले.

यावेळी शिवदास गायकवाड,बबन पुंड, एस.के.वैरागे,ह.भ.प. महादेव पुरी महाराज, वेदिका गायकवाड, नंदिता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.दिनांक १३,१४,१५ ऑगस्ट २०२५ सलग तीन(३) दिवस ' हर घर तिरंगा - घर घर तिरंगाकार्यक्रम घेण्यात आला.३ दिवस अध्यक्षस्थानी उद्धव गायकवाड हे होते.दि. १३ऑगस्ट २०२५ रोजी वसुदेवबप्पा गायकवाड दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी दादासाहेब गायकवाड तर दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी. ह.भ.प.नारायण महाराज गायकवाड यांचे व्याख्यान झाले व सलग ३ दिवस ध्वजारोहण करण्यात आले.दिनांक ९ ऑगस्ट २०१५ रोजी क्रांतीदिन साजरा करण्यातआला.जेष्ठ विचारवंत डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड यांचे व्याख्यान झाले अध्यक्षस्थानी बाळासाहेब गायकवाड हे होते.

# सुरज भैय्या घुले यांच्या संकल्पनेतून साकारले पंकजाताईंचे तैलचित्र !

केज/प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचे प्रयागराज येथील महाकुंभ मेळयातील सहभागाच्या अविस्मरणीय तेजस्वी क्षणाला मुर्तस्वरूप देण्याची संकल्पना ताईंचे खंदे समर्थक सुरज भैय्या घुले यांनी मांडल्यानंतर सुप्रसिद्ध चित्रकार महेश पंडित यांनी प्रत्यक्षात पंकजाताई यांचे तैलचित्र हुबेहूब साकारले.हे तैलचित्र सुरज भैय्या घुले यांनी पंकजाताई यांना मुंबई येथील त्यांच्या सरकारी बंगला रामटेक येथे भेट दिल्यानंतर अक्षरशः ताईसाहेब भारावून गेल्या.तसेच सुरज घुले यांनी दिलेल्या या अनमोल भेटीचे पंकजाताई मुंडे यांनी कौतुक केले.

दिल्लीतील सुप्रसिद्ध चित्रकार महेश पंडित यांच्याद्वारे ही पेंटिंग बनवण्यात आलेली आहे.महेश पंडित यांनी मा.राष्ट्रपती रामनाथ कोविंदजी,पंतप्रधान नरेंद्र मोदीजी,गृहमंत्री अमित भाई शहा,अरुण जेटली अशा अनेक नेत्यांच्या पेंटिंग्स बनवलेल्या आहेत. पर्यावरण व पशुसंवर्धन



मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचा प्रयागराज येथील महाकुंभ दरम्यानचा फोटो या पेंटिंगसाठी निवडण्यात आला होता ही पेंटिंग ६ फुट उंच व ४ फुट रुंद आहे.पेंटिंग तयार करण्यासाठी कलाकारांना तब्बल दोन महिन्यांचा कालावधी लागला.या पेंटिंगची संपूर्ण संकल्पना केज येथील भाजपचे युवा नेते सुरज भैय्या घुले यांची होती. त्यांनी दि.१३ ऑगस्ट २०२५ रोजी रामटेक, मुंबई येथे मंत्री ना. पंकजाताई मुंडेना ही पेंटिंग भेट म्हणून दिली. भेटीदरम्यान महत्त्वाच्या विषयांवर मंत्री ना.पंकजाताई मुंडेशी सुरज भैय्या घुले यांची चर्चा झाली.

सुरज भैय्या घुले यांची संकल्पना,मंत्री पंकजाताई मुंडे यांना झाला आनंद

तैलचित्र फ्रेम तयार करून सुरज भैय्या घुले यांनी ना.पंकजाताई मुंडे यांच्यानिवासस्थानी जाऊन भेट दिला. प्रयागराज येथील महाकुंभ दरम्यान फोटोचे तैलचित्र सुप्रसिद्ध चित्रकार महेश पंडित यांनी हुबेहुब साकारल्याबद्दल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी चित्रकार महेश पंडित यांचे फोनवर बोलून कौतुक केले. इतकेच नाही तर हे तैलचित्र त्यांनी तातडीने त्यांच्या बंगल्यात लावलेही.तसेच ना.पंकजाताई मुंडेनी महत्वाच्या विषयावर बोलण्यासाठी खास राखून वेळ दिल्याबद्दल त्यांचे आभार सुरज भैय्या घुले यांनी व्यक्त केले आहेत.



# तीन महामार्गांना जोडणारा तिंतरवणी-आर्वी मार्ग लवकरच साकार होणार

## मळेकर यांच्या पुढाकाराला यश

शिरूरकासार । प्रतिनिधी

तालुक्यातील तिंतरवणी-निमगाव मायंबा-नांदेवाली-आर्वी-पाडळी फाटा हा अनेक वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत असलेला राज्य मार्ग क्रमांक ६२ लवकरच साकार होण्याची शक्यता आहे. आर्वी येथील सेवानिवृत्त मुख्य अभियंता दिगंबर मळेकर यांनी थेट केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन या रस्त्याच्या कामासाठी मंजुरीची मागणी केली. राज्य शासनाकडून शिफारस आल्यानंतर मंजुरी देण्याचे आश्वासन गडकरी यांनी यावेळी दिले.

या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्यास तिंतरवणी मार्गे विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग, नवगण राजुरी-खरवंडी राष्ट्रीय महामार्ग आणि बीड-शिरूरकासार-पाथडी राज्य मार्गाला थेट जोड मिळणार आहे. यामुळे प्रवासाचा कालावधी व अंतर कमी होणार असून दळणवळण अधिक सुलभ होईल. तसेच मच्छिंद्रगड, निमगाव, पैठण, पंढरपूर यांसारख्या महत्त्वाच्या धार्मिक स्थळांना जाणारा मार्ग अधिक सोपा व सुकर होणार आहे.या उपक्रमामुळे तीन प्रमुख महामार्गांना तसेच महत्त्वाच्या धार्मिक स्थळांना जोडणारा महत्त्वपूर्ण रस्ता उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असून सेवानिवृत्त मुख्य आभियंता दिगंबर मळेकर यांच्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गंगाखेड तालुक्यात पावसाची सततधार

## पाणी साचल्याने राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक एकेरी

गंगाखेड : स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येपासून गंगाखेड तालुक्यात सर्वदूर पावसाची सततधार सुरू असून पाहावे तिकडे पाणीच पाणी झाले आहे. शहरातून जाणाऱ्या नांदेड-पुणे राष्ट्रीय महामार्गावर उपजिल्हा रुग्णालयासमोरून ते परळी नाक्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. रस्त्यावरील गुडघ्याएवढे खड्डे पाण्याखाली गेल्याने सर्वच प्रकारची वाहने खड्ड्यात आदळत आहेत. शुक्रवार रोजी येथे दुचाकी मोटार सायकल व तीन चाकी ऑटो अपघाताच्या अनेक घटना घडल्याने खबरदारी म्हणून नागरिकांनी येथील वाहतूक एकेरी केली आहे.

चालू पावसाळ्यात सुरुवातीला विश्रांती घेतलेल्या पावसाने १४ ऑगस्ट रोजी रात्रीपासून जोरदार हजेरी लावली. १५ ऑगस्ट सकाळपासून रात्रीपर्यंत आणि त्यानंतर १६ ऑगस्ट रोजी दिवसभर पावसाची सततधार सुरूच होती. यामुळे गंगाखेड शहर व परिसर जलमय झाला. शहरातून जाणाऱ्या नांदेड पुणे राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने अनेक वाहने अपघातग्रस्त झाली असुन शुक्रवार रोजी तीनचाकी ऑटोसह काही दुचाकीस्वार हे पाण्याखालील खड्ड्यांमध्ये आदळून जखमी झाले. त्यामुळे व्यापारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरपरिषदेला संपर्क साधला मात्र याकडे दुर्लक्ष झाल्याने संतप्त नागरिकांनी स्वतःच वाहतूक एकेरी केली आहे. दरम्यान नांदेड-पुणे महामार्गावरील गंगाखेड शहरातील दत्त मंदिर परिसर ते परळी नाक्यापर्यंत रस्त्यांवर मोठे खड्डे पडले आहेत. गंगाखेड विधानसभा मतदार संघात हजारो कोटी रुपये खर्च करून झालेला हा विकास आहे का? असा संतप्त सवाल वाहनधारक व नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. साचलेल्या पाण्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, यह जनता की है ललकार, बंद करो यह भ्रष्टाचार या गाण्यासह शहरात खर्च झालेले ११०० कोटी कुठे गेले? असे ही नागरिकांतून बोलल्या जात आहे.

शहरातील मुख्य रस्ता असलेल्या नांदेड पुणे महामार्गावर पाणी साचल्याने येथे उदभवलेल्या समस्येबाबत नगरसेवक चंद्रकांत खंदारे यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी जयवंत सोनवणे, प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्याशी संपर्क साधत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या जीवास धोका निर्माण होत असल्याची तक्रार करत येथील वाहतूक एकेरी केल्याची माहिती दिली असता शनिवार १६ ऑगस्ट रोजी उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर यांनी येथे भेट देऊन येथे साचलेले पाणी काढून देण्याच्या सूचना नगर परिषद प्रशासनाला दिल्याने जेसीबी मशीन द्वारे येथील पाणी काढून देण्याची कारवाई सुरु करण्यात आली मात्र सायंकाळपर्यंत पाणी काढून देण्याच्या कामाला यश आले नव्हते.



ग्रामपंचायत अधिकारी श्री. त्रिंबक मुळीक यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करतांना मा. सभापती श्री. बद्रीनाथ जगताप, डॉ. बाबासाहेब आंबेडकर फोरम चे जिल्हाध्यक्ष तथा मा. पं. स. सदस्य श्री. यशवंत खंडागळे, श्री. प्रविण वारे, श्री. संपत कोळेकर, श्री. नवनाथ लोंढे, श्री. राजेंद्र लाड दिसत आहेत.

# आनंद शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## डॉ.अजय धोंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

### राष्ट्रभक्ती व शेतकरी गीतांना संस्थाध्यक्ष धोंडे यांच्याकडुन भरभरुन दाद

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील आनंद शैक्षणिक संकुलातील कृषी महाविद्यालयात ७९ वा. स्वातंत्र्यदिन राष्ट्रभक्तिपूर्वक आणि उत्साहात साजरा करण्यात आला. आनंद चॅरिटेबल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. संस्थेचे सहसचिव डॉ. अजयदादा धोंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास प्रा. राजेंद्र धोंडे, अभयराजे धोंडे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, संजय शेंडे, प्रा. सागर वाघुले, संदीप ननवरे, शिवाजी थोरवे, सुभाष वाघ, आनंद शैक्षणिक संकुलातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पोलीस कॉन्स्टेबल रमेश गिरी व विद्यार्थी उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तिपर व शेताकरी गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. १२ गीतांची सादरीकरणे करण्यात आली. कृषी महाविद्यालयाच्या शेतकरी गीतासाठी



उपस्थितांनी भरभरून असा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष भीमराव धोंडे यांनी शेतकरी गीतामध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना १० हजार रु. बक्षीस दिले. संस्थेच्यावतीने स्पर्धक विद्यार्थ्यांना रोख रक्कम स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. बक्षीस वितरण स्वरूप प्रथम क्रमांक ५००१ रु, द्वितीय क्रमांक ३००१ रु, तृतीय क्रमांक २००१ रु, डिप्लोमा विभाग प्रथम क्रमांक डी. फार्मसी महाविद्यालय, द्वितीय क्रमांक नर्सिंग महाविद्यालय, तृतीय क्रमांक डिप्लोमा इंजिनिअरिंग विद्यालय. डिग्री विभाग प्रथम क्रमांक श्री छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालय, द्वितीय व तृतीय क्रमांक बी. फार्मसी महाविद्यालय. तंत्रनिकेतनचे प्राचार्य संजय बोडखे यांनी कु. ऋतुजा पांडुरंग कवाळे हिला उत्कृष्ट देशभक्तीपर गीत ओ देश मेरे गायनाबद्दल १ हजार रुपये बक्षीस दिले. डॉ. अजयदादा धोंडे यांनी आपल्या मनोगतात सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे विशेष कौतुक केले.

आनंद शैक्षणिक संकुलातील सर्व महाविद्यालयांची उत्तरोत्तर प्रगती होत आहे. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढतो असे मत व्यक्त केले. त्यांनी सर्व महाविद्यालयांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि संस्थेच्या वतीने अशाच उपक्रमांचे आयोजन पुढेही करण्यात येईल असे सांगितले. ध्वजारोहण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एल. एस. मिसाळ तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कु. एस. एल. बनकर यांनी केले. आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. एस. आर. आरसुळ यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब खेमगर, डॉ. राजाभाऊ ढोबळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. एस. पवार यांनी काम केले. एकात्मतेचे आणि देशप्रेमाचे दर्शन घडवणारा हा सोहळा संस्मरणीय ठरला.



## पाटोद्याच्या विकासासाठी नगरसेवक संतोष दादा जाधव यांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची घेतली भेट

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहर व तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी पाटोदा नगरपंचायतचे नगरसेवक संतोष दादा जाधव यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेऊन शहरातील अनेक महत्त्वाचे प्रश्न मांडण्यात आले. नगरसेवक संतोष जाधव यांच्या सोबत अंमळनेर जिल्हा परिषद गटाचेनेते बाळासाहेब पवार व पारगाव जिल्हा परिषद गटाचेनेते शामराव हुले उपस्थित होते. तिघांनीही आपल्या भागातील समस्या आणि विकासाचे प्रश्न पालक मंत्र्यांसमोर माडले यावेळी नगरसेवक संतोष दादा जाधव म्हणाले जनतेच्या समस्या सोडवून पाटोद्याचा चेहरा मोहरा बदलणे हे आमचे ध्येय आहे. आगामी काळात अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पाटोद्याचा विकास जलद गतीने होईल.

# संघर्षयोद्धा हाजी शब्बीर शेख यांचे निधन

## समाजसेवक डॉक्टर नदीम शेख यांचे वडिल

आष्टी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) अल्पसंख्याक बीड जिल्हाध्यक्ष डॉ. नदीम शेख यांचे वडील आणि कडा सहकारी साखर कारखान्यातील एक संघर्षशील कर्मचारी नेते म्हणून ओळखले जाणारे, हाजी शब्बीर शेख यांचे शुक्रवारी रात्री उशिरा तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. नुकतीच हज यात्रा पूर्ण करून आलेले आणि मुलाच्या पुरस्काराने आनंदात असलेल्या शेख कुटुंबावर या घटनेने दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या निधनाने आष्टी तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. हाजी शब्बीर शेख हे आष्टी तालुक्याची कामधेनू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कडा सहकारी साखर कारखान्यात एकनिष्ठ कर्मचारी होते. कारखाना बंद पडल्यानंतर त्यांनी कामगारांच्या हक्कांसाठी अनेक आंदोलने, उपोषणे आणि मोर्चे काढून लढा दिला. अत्यंत खडतर परिस्थितीतही त्यांनी हार मानली नाही. आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी प्रचंड संघर्ष केला आणि एका मुलाला डॉक्टर, एक वकील तर तिसरा मुलगा न्यायालयात कर्मचारी आहे. त्यांचा हा जीवनप्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी होता.



सर्व काही सुरळीत सुरू असताना आणि जीवनातील संघर्षानंतर सुखाचे दिवस आले होते. नुकतेच पवित्र रमजान महिन्यात त्यांनी आपल्या पत्नीसह हज यात्रा पूर्ण केली होती. घरात आनंदाचे वातावरण होते, कारण कालच, १५ ऑगस्ट रोजी, त्यांचे सुपुत्र डॉ. नदीम शेख यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल अखिल नागरिक एकता मंच, पुणे यांच्या वतीने उत्कृष्ट समाजसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या आनंदावर अवघ्या काही तासांतच विरजण पडले. शुक्रवारी रात्री हाजी शब्बीर शेख यांना अस्वस्थ वाटू लागले. घरी उपस्थित असलेले डॉ. नदीम यांनी तात्काळ प्राथमिक उपचार केले, परंतु प्रकृती अधिकच खालावल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे नेत असताना वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.

हाजी शब्बीर शेख यांच्या पार्थिवावर आज, शनिवारी सायंकाळी ७ वाजता आष्टी येथील काली मशीद कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला. यावेळी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. डॉ. नदीम शेख यांचे वडिलांवरील अपार प्रेम त्यांच्या हुंदक्यांतून आणि अश्रूमधून जाणवत होते. कालच सामाजिक कार्यासाठी पुरस्कार स्वीकारणाऱ्या आज दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एका चांगल्या समाजसेवकाने आपला आधारस्तंभ गमावला आहे. हाजी शब्बीर शेख यांना राजेंद्र लाड परिवाराकडून व दै. समर्थ राजयोग परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली..!!!

# संघर्ष माजी सैनिक सेवा संघाच्या कार्यालयाचे पत्रकार चंद्रकांत पाटील व गौतम बचुटे यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

केज/प्रतिनिधी

केज शहरातील पंचायत समितीच्या कर्मचारी निवासस्थानी संघर्ष माजी सैनिक सेवा संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन पत्रकार चंद्रकांत पाटील व गौतम बचुटे यांच्या शुभहस्ते दि.१५ ऑगष्ट २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघर्ष माजी सैनिक सेवा संघाचे केज तालुकाध्यक्ष मेजर अजिमोद्दीन इनामदार शेख हे होते.सर्वप्रथम फलकाचे फित कापुन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे तालुकाध्यक्ष तथा दैनिक समर्थ राजयोग चे तालुका प्रतिनिधी तथा स्वाभिमानी न्युज चे संपादक चंद्रकांत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.तसेच कार्यालयाचे उद्घाटन आदर्श पत्रकार संघाचे पदाधिकारी तथा दैनिक पुढारी चे प्रतिनिधी गौतमजी बचुटे यांच्या शुभहस्ते फित कापुन करण्यात आले.यावेळी माजी सैनिक बांधवांनी श्रीफळ वाढवून कार्यालयाचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी प्रास्ताविक करताना माजी सैनिक मेजर रामप्रभु राऊत यांनी सांगितले की,पत्रकार आणि सैनिक यांच्या मुळे देशात सौहार्दाचे वातावरण कायम राहिलेले आहे.



सैनिकाचा धर्म व जात माणुसकी आहे त्यामुळे भारत देशात शांतता नांदत आहे.सिमेवर डोळ्यात तेल घालून सैनिक सेवा बजावत असतात त्यामुळे सैनिकांप्रती आदरभाव असावा तसेच माजी सैनिकांच्या अडी अडचणी सोडविण्या साठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. पत्रकार गौतम बचुटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सैनिकांमुळे आपण सुरक्षित आहोत माझ्या परिवारामध्ये सैनिक आहेत याचाआपल्याला अभिमान आहे. सैनीकांच्या पाठीशी सदैव आपण राहु अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.पत्रकार चंद्रकांत पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले की, संघर्ष माजी सैनिक सेवा संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन आपल्या हस्ते संपन्न झाले हा आपल्या आयुष्यातील सर्वात मोठा दिवस असुन स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी आमचा सन्मान माजी सैनिकांच्या हस्ते झाला हे आमचे भाग्य आहे तसेच माजी सैनिकांच्या सुखदुःखात आम्ही कायम सोबत आहोत असे त्यांनी सांगितले. पत्रकार नंदुलाल मिसाळ यांनी बोलताना सांगितले की,माझे बंधू सैन्य दलात सेवा बजावत असताना शहीद झाले आहेत. कोल्हेवाडी येथे त्यांचे स्मारक असुन सर्व शासकीय कार्यक्रमाच्या वेळी तेथे सन्मान केला जातो.अध्यक्षीय समारोप करताना मेजर अजिमोद्दीन इनामदार शेख यांनी सांगितले की, माजी सैनिकांच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून दिली याबद्दल प्रशासनाला धन्यवाद दिले तसेच माजी सैनिकांच्या कामासाठी आपण सदैव कार्यरत आहोत हे सर्व माजी सैनिकांच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे.

# स्वातंत्र्य दिनी मानवी साखळी तयार करून साकारला भारताचा नकाशा..!

## 'हम सब एक है' चा संदेश देत विद्यार्थ्यांनी केल्या महापुरुषांच्या वेशभूषा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

'हर घर तिरंगा' उपक्रमाचा एक भाग म्हणून तसेच 'हम सब एक है' चा संदेश देत विद्यार्थ्यांनी विविध महापुरूषांच्या वेशभूषा केल्या, या सोबतच स्वातंत्र्य दिनी १५० जणांची लक्षवेधी मानवी साखळी तयार करून भारताचा नकाशा साकारला. शहरातील आई सेंटर प्रो व बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यु व्हिजन पब्लिक स्कूलने विधायक उपक्रम राबवून भारताचा ७९ वा स्वतंत्रता दिवस साजरा केला.

अंबाजोगाई शहरालगत असलेल्या रिंग रोड शेजारील मोदी लर्निंग सेंटर कॅम्पस मधील बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यु व्हिजन पब्लिक स्कूलच्या भव्य प्रांगणात शुक्रवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारताच्या ७९ व्या स्वतंत्रता दिवसानिमित्त 'स्वातंत्र्याचा सन्मान करणे, भविष्याला प्रेरणा देणे' ही थीम घेऊन विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका, पालक असे एकूण १५० जणांनी एकत्र येऊन राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतली. आणि सर्वात मोठी मानवी साखळीच्या सहाय्याने भारताचा नकाशा साकारण्यात आला. स्वातंत्र्य दिन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, अंबाजोगाईचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर (पापा) मोदी हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक आई सेंटर प्रो चे संचालक सर नागेश जोंधळे, ह.भ.प.डॉ.सय्यद रफिक पारनेरकर महाराज, राष्ट्रपती पदक विजेते सय्यद रेहमान, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, माजी प्राचार्य चंद्रकांत गायकवाड, न्यु व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य एम.प्रशांत कुमार, ज्येष्ठ पत्रकार जगन सरवदे, संपादक रणजित डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना राजकिशोर (पापा) मोदी यांनी सर नागेश जोंधळे यांच्या माध्यमातून शिक्षण व प्रशिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य होत आहे असे नमूद केले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या चौकटीत राहून 'हम सब एक है' चा संदेश आपण सर्वांनी जोपासला पाहिजे असे सांगून अंबाजोगाई हे शहर अठरा पगड जातीधर्माच्या लोकांचे शांतता, सद्भाव, संस्कृती व भारतीयत्व जोपासणारे महाराष्ट्राला दिशा देणारे शहर आहे असे त्यांनी सांगितले. ह.भ.प.डॉ.सय्यद रफिक पारनेरकर महाराज यांनी मार्गदर्शन करताना जगात शांतता, समृद्धी, आनंद, सुसंवाद, सुसंस्कार एकत्र नांदावेत. मनुष्य जातीसह प्राणीमात्र सुखी रहावेत अशी प्रार्थना करून भारतीय स्वातंत्र्य, संविधान, लोकशाही, समता, बंधुता या विषयावर मौलिक विचार व्यक्त केले. तर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या भाषणातून विविध दाखले देत, शेरोशायरीतून देशप्रेमाचे स्फुल्लिंग जागविले. तर राष्ट्रपती पदक विजेते सय्यद रेहमान यांनी युवा पिढीने निर्व्यसनी रहावे, आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करावे, देशासाठी योगदान द्यावे, आई-वडिलांची सेवा करावी असे आवाहन केले. प्रारंभी सर नागेश जोंधळे यांनी भारताच्या ७९ व्या स्वतंत्रता दिवसानिमित्त 'स्वातंत्र्याचा सन्मान करणे, भविष्याला प्रेरणा देणे' ही थीम नेमकी काय आहे याबाबत उपस्थितांशी संवाद साधला. राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी संविधान अभ्यासणे काळाची गरज आहे असे ते म्हणाले. यापूर्वी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आणि हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, अंबाजोगाईचे सचिव राजकिशोर (पापा) मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी व न्यु व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य एम.प्रशांत कुमार यांचे जोंधळे यांनी आभार मानले. सुरूवातीला शंकर सिनगारे यांनी त्यांच्या मधुर आवाजात 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत गाऊन महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाला पाठिंबा दर्शविला. हा ऐतिहासिक स्वातंत्र्य दिन सोहळा यशस्वी करण्यासाठी विश्वविक्रमवीर सर नागेश जोंधळे



यांच्या नेतृत्वात कृतिशील मुख्याध्यापिका पुनम माने (जिल्हा परिषद शाळा, वडार वाडा, चनई.) यांनी पुढाकार घेत येथील विद्यार्थ्यांना आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढणाऱ्या विविध व्यक्तिमत्त्वांचा पेहरावामध्ये इयत्ता पहिलीतील तनुजा परमेश्वर अलकुंटे (कॅप्टन लक्ष्मी सेहगल), इयत्ता दुसरी वर्गातील रोहिणी राहुल गोचडे (नी बेझंट), सिया नागनाथ चौगुले (क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले), निकिता परमेश्वर पेठकर (बेगम हजरत महल), समृद्धी सुहास वरवडे (मॅडम कामा), इयत्ता ५ वी वर्गातील रोहित राहुल गोचडे (क्रांतीसूर्य ज्योतिराव फुले तसेच न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे रिया व आराध्या जोत्सना बालासाहेब कदम या चिमुकल्या बहिणींनी (अनुक्रमे इंडियन व सावित्रीमाई फुले), यश स्वाती नागेश जोंधळे (डॉ.बाबासाहेब आंबेडकर), शिवेंद्र सुनिता रणजित डांगे (लोकनायक जयप्रकाश नारायण), सोनम कांबळे (सरोजिनी नायडू), जुळी भावंडं हुझैफ व उझैर आफरीन अलीम शेख यांनी अनुक्रमे (मौलाना अब्दुल कलाम आझाद व डॉ.राजेंद्र प्रसाद), समर्थ सुषमा श्रीराम साखरे (लाल बहादूर शास्त्री), नयन नम्रता महेश जाधव (पंडीत जवाहरलाल नेहरू) या महापुरूषांच्या आकर्षक वेशभूषेत सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळची थीम 'स्वातंत्र्याचा सन्मान करणे, भविष्याला प्रेरणा देणे' 'तसेच हम सब एक है, भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू होवो' चा नारा देत भारतीय संविधानाची उद्देशिका यांचे सामूहिक वाचन करून ७९ वा स्वातंत्र्य दिन अतिशय उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली न्यु व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य, सर्व शिक्षिका, शिक्षकवृंद, कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच ॲड.अलिम शेख, राजेसाहेब सरदेशमुख (मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा.श्रीपतरायवाडी), संगणक तज्ज्ञ सुनिल वाघमारे, सुमित खोत, सोमनाथ विभुते, धम्मदीप वैद्य, रोहन खंदारे, प्रेस फोटोग्राफर प्रविण चोपने आणि सर्व आई सेंटरच्या फॅमिली मेंबर्सनी परिश्रम घेतले. यापूर्वी ही शहरातील आई सेंटर प्रो चे संचालक सर नागेश जोंधळे यांच्या कल्पक दृष्टीकोनातून अंबाजोगाईकरांनी भारतीय प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध जागतिक विक्रमांना गवसणी घातली आहे हे विशेष होय.

# मुसळधार पावसाने सोयाबीन कापूस पिके पाण्याखाली कौसडी शिवारातील प्रकार

प्रतिनिधी कौसडी

जिंतूर तालुक्यातील कौसडी शिवारात दिनांक १५ ऑगस्ट रोजी सकाळी सात ते आठ दरम्यान अचानक जोराचा मुसळधार पाऊस झाल्याने परिसरात ओढयला आलेला पूर आल्यामुळे सोयाबीन कापूस पिके पाणी खाली गेले आहेत शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी अशी मागणी ग्रामस्थ यांनी केली आहे

पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांना भेट घेऊन परिस्थितीची माहिती निदर्शनास आणून दिले दिली दिनांक १५ ऑगस्ट रोजी सकाळी सातच्या दरम्यान मुसळधार पाऊस झाल्याने कौसडी परिसरात चिंताजक तयार झाले असून परिसरातील ओढ्याने आलेला मोठा पूर आला असून हे पाणी शेतात घुसली या पाण्याने



कापूस सोयाबीन पिकाचे अतोनात नुकसान झाले असून हे पंचनामे शासनाने सुरू करावी यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे सोयाबीन कापूस पिके जोमात होती परंतु निसर्गाच्या या कृपेने शेतकऱ्याचा घास हिरावून घेतल्याची दिसून आले आहे

# भरपावसात अंतापूरकरांचा पाहाणी दौरा ; पावसातही शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या

देगलूर, प्रतिनिधी

देगलूर, ता. १६ (प्रतिनिधी) : देगलूर तालुक्यातील कुरुडगी, नरगंल, तूपशेळगाव या परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले आहे. पावसामुळे रस्ते खचले, पुलांवरून पाणी वाहिले, तसेच शेतांमध्ये पाणी शिरल्याने उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी सुपीक जमीन खरवडून गेली असून शेतकऱ्यांची स्थिती गंभीर झाली आहे. नरगंल येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या प्रांगणातही पाणी साचले होते.

या पार्श्वभूमीवर आमदार जितेश अंतापूरकर यांनी नुकसानग्रस्त गावांचा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी केली. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांनी नुकसानाची माहिती घेतली आणि तातडीने मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.



तहसीलदार, तलाठी व संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत व नुकसानभरपाई मिळावी, तसेच शासकीय योजना तत्काळ लागू करण्यात याव्यात, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

या दौऱ्यात महसूल, महावितरण, पोलीस प्रशासन, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पावसामुळे नागरिकांसमोर उभ्या राहिलेल्या समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे आमदार अंतापूरकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

